जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# व्हिडिओकॉन कंपनी गेटवर कामगारांनी केले आंदोलन, आठ दिवसांत पगार न दिल्यास आमरण उपोषण करणार

### कामगारांचा थकीत पगार तातडीने द्या : जिल्हा मजदूर सेनेचे अध्यक्ष बाबू टायरवाले

नगर – बुऱ्हानगर येथील व्हिडिओकॉन कंपनीत काम करणाऱ्या ३२ कामगारांचा मार्च २०१८ पासून नोव्हेंबर २०२३ पर्यंतचा पगार थकीत असून, त्या पगारासाठी अखेर नगर जिल्हा मजदूर सेनेने औद्योगिक न्यायालयात याविषयी दावा दाखल केला होता. न्यायालयाने या प्रकरणात कामगारांच्या बाजूने निकाल देत जिल्हाधिकारी यांना कामगारांचा थकीत पगार व्याजासह रु. ३ कोटी ७५ लाख ८५ हजार १४० इतकी रक्कम तातडीने अदा करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर सेनेचे अध्यक्ष बाबू टायरवाले यांच्या नेतृत्वाखाली कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शने करण्यात आली.

कामगारांनी ८ वर्षे संयमाने वाट पाहिली आहे. आता न्यायालयाचा आदेश आहे, तरीही प्रशासन दुर्लक्ष करीत असेल तर ८ दिवसांनंतर आम्हाला आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल. याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल, असा इशारा बाबू टायरवाले यांनी दिला.



आठ दिवसांत पगार न करण्याच्या मागणीसाठी सेनेचे अध्यक्ष बाबू टायरवाले यांच्या नेतृत्वाखाली व्हिडिओकॉन कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर निदर्शने करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

यावेळी विद्या पवार, आरती बागडे, सुनिता तेलधुणे, सपना भिंगारदिवे, शैला रासने, सुनीता चक्रे, बिजला लांडे, विजया धुमाळ, अनिल झावरे, पाराजी पानसंबळ, नितीन गांधी, रवींद्र कुदळे, आप्पा पाटील, संजय राजुरकर, लक्ष्मण लोखंडे, अनिल पंकज, साहेबराव गायकवाड, अतुल पानसरे आदी कामगार उपस्थित होते.

व्हिडिओकॉन कंपनीची ३६ एकर मालमत्ता बँकेच्या ताब्यात गेल्यानंतर तिचा लिलाव करण्यात आला असून त्या मालमतेची खरेदीही झाली आहे. मात्र एवढं सगळं होऊनसुद्धा कामगारांना त्यांचा न्याय मिळालेला नाही. कामगारांचा पगार देईपर्यंत झालेली मालमतेची खरेदी रद्द करण्यात यावी. जिल्हाधिकाऱ्यांनी कामगार न्यायालयाच्या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करून कामगारांचा थकीत पगार अदा करावा, अन्यथा नगर जिल्हा मजदूर सेना अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही बाबू टायरवाले यांनी यावेळी दिला.

## प्रेरणादायी अक्षरधन...






### सर्वोत्तम रवींद्र पिंगे

स्व. रवींद्र पिंगे. गेली ६/७ दशके कागदाच्या शुभ्र हाकेला होकार देत, आंतरिक उर्मीनं लेखन करणारे घरंदाज लेखक.

अवसान अन् आग्रह वगळून मर्मशोधक, अल्पाक्षरी, रसाळ ललित लेखन करणारे शब्दांचे विणकर. सातत्य हा त्यांचा आगळावेगळा गुण परंतु हे सातत्य आहे अंतरीच्या आनंदाच्या झऱ्याचं! म्हणूनच ते पुन्हा पुन्हा वाचावंसं वाटतं.

पिंगे सर म्हणायचे, ''हातून सत्त्वशील लिहून होणं हेच लेखकाला लाभणारं विष्णुरुप दर्शन.''

''मी लेखन करतो कारण दुर्मिळ अशा तंद्रीचा अनुभव मला लेखन करतांना येतो. या तंद्रीत तुडुंब सुख आहे. समाधानाच्या सरोवराकडे एकट्याने जाण्याची ती अद्‌भूत पायवाट आहे. कोऱ्या कागदाची हाक सतत कानावर पडणे ही श्रीरामाची माझ्यावरील परमकृपा.''

त्यांचे वडील त्यांना म्हणाले होते, ''तू इस्टेट केली नाही पण तुझं नाव हीच तुझी इस्टेट आहे.'' (प्रत्येक सृजनशील माणसानं जपून, मनात साठवावं असं हे सुवर्ण वाक्य आहे).

या सर्वोत्तम अशा २५ लेखांत विविधता आहे. केवळ लेखनशैलीचीच नव्हे तर विषयांची, अनुभवांची विविधता आहे. रवींद्र पिंगे यांचे मन जीवनाविषयी उत्कट कुतुहल बाळगणारे आहे. ते सोईस्कर साच्यात सुखाने बंदिस्त होणारे आत्मसंतुष्ट मन नाही.

त्यांच्या लेखात भाविकतेचा केवळ ओघळच नव्हे तर, इथे भाविकतेचा धबधबाच आहे.

सहजसुंदर, रसाळ, मधाळ, अलंकारिक आणि मनाचा ठाव घेणारी भाषा आवडणाऱ्यांनी रवींद्र पिंगेंची पुस्तके जरूर वाचायला हवी.

– किशोर गांधी

## अपघातात मृत इसमाची ओळख पटवण्याचे आवाहन

नगर – छत्रपती संभाजीनगर ते नगर रोडवर मिलिटरी मस्जिद जवळ १८ मार्च रोजी पहाटे रस्ता अपघातात जखमी झालेल्या अनोळखी इसमाचा उपचारापूर्वी मृत्यू झालेला आहे. त्याची ओळख अद्याप पटलेली नसून त्याच्या नातेवाईकांबाबत माहिती देण्याचे आवाहन भिंगार कॅम्प पोलिसांनी केले आहे.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत इसमाची उंची १७० सेमी, शरीर बांधा मजबूत, चेहरा उभट, रंग सावळा, दाढी वाढलेली, केस काळे पांढरे, मिशी काळी, अंगात पांढरा शर्ट, पांढरा पायजमा असे आहे. या इसमास कोणी ओळखत असल्यास त्यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे फोन ०२४१ २४१६१२१, किंवा तपासी अंमलदार ए ए कासार मोबाईल नं ९३७३९४९८७० या फोनवर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



रस्त्याचे काम सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता संदीप बडगे यांना देताना ग्रामस्थ.

# रस्त्याचे काम सुरू न झाल्यास २१ जूनला रास्ता रोको आंदोलन

नगर – नगर–मनमाड मार्गावरील नागापूर चौक येथील सन फार्मा कंपनीपासून ते निंबळक हद्दीतील अपोलो कंपनीपर्यंतच्या रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, सद्यस्थितीत या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण वाढले असून, तात्काळ काम सुरु करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता संदीप बडगे यांच्याकडे निवेदन सादर केले. या रस्त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन अनेक दिवस उलटले असूनही अद्याप ठेकेदार नेमण्यात आलेला नाही, यामुळे कामास विलंब होत असून नागरिकांचे हाल वाढले आहेत.

दररोज हजारो वाहनांची व नागरिकांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. येत्या ८ दिवसांत रस्त्याचे काम सुरु न झाल्यास २१ जून रोजी नागापूर – नगर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस प्रशासनच जबाबदार राहील, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी अप्पासाहेब सप्रे, ग्रामपंचायत सदस्य संजय भोर, महादेव सप्रे, नवनाथ काळे, शिवाजी दिवटे, दत्तुमामा दिवटे, छबुराव गायकवाड, बाळासाहेब कोतकर, अनिल पवार, निलेश पाडळे, रोहिदास केदार, प्रदीप बोबडे उपस्थित होते.

# वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिक झाले त्रस्त

### कल्याण रोड परिसरातील नागरिकांचे आमदार संग्राम जगताप यांना निवेदन

नगर – कल्याण रोड परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने वीज पुरवठा खंडित होत असून, त्यामुळे या परिसरातील नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहे. त्यामुळे या त्रस्त नागरिकांनी वीज पुरवठा सुरळीत राहावा यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना द्याव्यात, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने याबाबत अ.संग्राम जगताप यांना निवेदन देताना नागरिक. (छाया – लहू दळवी)

कल्याण रोड परिसर हा झपाट्याने विकसित होत, असल्यामुळे या परिसरामध्ये नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यस आहे. ट्रान्सफार्मरची संख्या कमी असल्यामुळे त्यांना पूर्ण दाबाने वीजपुरवठा होत नसून, तो वारंवार खंडित होत आहे. त्यामुळे घरातील विजेवर चालणारे उपकरणे फ्रिज, फॅन, टीव्ही, वॉशिंग मशीन या वस्तू अक्षरशा जळत आहे. त्यामुळे नागरिकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते, एखाद्या दिवशी शॉर्ट सर्किटमुळे एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तरी कल्याण रोड परिसराचा वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावे. अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे कल्याण रोड परिसरातील ॲड. युवराज शिंदे, कुंडलिक आरवडे, शंकर पाटील, सुधाकर बोली, राजेंद्र जगताप, राजेंद्र पाडळे, विराज टाक, विवेक विधाते यांनी केली.

आ. संग्राम जगताप यांनी शिष्टमंडळास सांगितले की, शहरामध्ये ट्रान्सफार्मरची संख्या कमी असून ते बसवण्यासाठी विद्युत विभागाकडे पाठपुरावा केला आहे. त्यांनी देखील महापालिकेकडे जागेची मागणी केली असून, लवकरच ट्रान्सफार्मर बसविण्याचे काम केले जाणार आहे. यावेळी आ. संग्राम जगताप यांनी विद्युत विभागाचे उपअभियंता यांना फोन करून तातडीने कल्याण रोड परिसरामध्ये जाऊन विजेचा प्रश्न मार्गी लावून देण्याच्या सूचना दिल्या.

## विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

नगर – विहिरीत पडून १७ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील अरणगाव येथील बायपास चौकाजवळील बारगजे पेट्रोल पंपामागील विहिरीत १५ जून रोजी रात्री १० वाजण्याचे सुमारास घडली. सुरज रोहिदास पवार (वय १७, रा. अरणगाव, ता.नगर) असे मृत तरुणाचे नाव आहे.



सूरज पवार

अरणगाव येथील बायपास चौकातील बारगजे पेट्रोलपंप पाठीमागील असलेल्या विहिरीत सुरज पवार हा बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. ही घटना माहीत होताच त्याचे नातेवाईक परमेश्वर फुलारे यांनी त्यास औषधोपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले.

याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या अहवालानुसार नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार गांगर्डे हे करीत आहेत. मयत सुरज याच्या पश्चात आई, वडील, २ बहिणी असा परिवार आहे.

# भाग्योदय विद्यालयात नवागतांचे औक्षण व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

नगर – भाग्योदय विद्यालयामध्ये नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरणही करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुभाष बागले यांची उपस्थिती होती. तसेच प्राचार्य ज्ञानदेव बेरड, मुख्याध्यापक बन्सी नरवडे, पालक प्रतिनिधी प्रल्हाद काकडे, सौ. माने व सौ. ढाकणे यांचाही सहभाग होता.

कार्यक्रमाची सुरुवात बन्सी नरवडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना, पहिल्या दिवसापासूनच नियमित अभ्यास, लवकर झोपणे आणि लवकर उठणे यांचा संकल्प मुलांनी करावा, असे सांगितले.



भाग्योदय विद्यालयात नवागतांचे औक्षण व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

डॉ. बागले यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पालकांनी मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्याचा सल्ला दिला. तसेच त्यांनी मुलांच्या आहारात पारंपरिक आणि पौष्टिक अन्नाचा समावेश करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. फास्टफूड टाळा, मुलांना वरण–भात, भाजी–पोळी द्या. त्यांना मैदानी खेळ खेळू द्या आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेळ द्या, असे आवाहन त्यांनी पालकांना केले.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी शाळेच्या शैक्षणिक नियोजनाची माहिती दिली. पहिल्याच दिवसापासून अध्यापन सुरू करण्यात आले आहे. पालकांनी शाळेच्या बैठकीस उपस्थित राहून शासनाच्या शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सुविधांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले आणि त्यांना गुलाब पुष्प, बिस्किट व गोड जेवण देण्यात आले. तसेच इ.१० वी व १२ वी. बोर्ड परिक्षेत प्रथम तीन क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. दत्तात्रय पांडुळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर आभार प्रदर्शन संतोष काकडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक कोतकर बाबासाहेब, साहेबराव कार्ले, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, सौ.रेणुका गुंड, आदिनाथ ठुबे, सौ. रूपाली शिंदे, तसेच ज्युनियर कॉलेजचे कदम गोविंद, गोरक्ष कांडेकर, एकनाथ होले, गणेश गायकवाड, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

## नदीवरील बंधाऱ्यात पाय घसरून पडल्याने शेतकऱ्याचा बुडून मृत्यू

नगर – नदीवरील बंधाऱ्यात पाय घसरून पडल्याने गाळात अडकून पाण्यात बुडून एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १५ जून रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नगर तालुक्यातील हिंगणगाव येथील पानसरे वस्ती येथील बंधाऱ्यांमध्ये घडली. विलास जगन्नाथ पानसरे (वय ५७, रा. हिंगणगाव, ता.नगर) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे.



विलास पानसरे (मयत)

मयत विलास पानसरे हे घरापासून शेतीकडे रोज या बंधाऱ्यावरून जात असतात. १५ जून रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे या बंधाऱ्याच्या भिंतीवरून जात असणाऱ्या शेवाळावर त्यांचा पाय घसरून ते खोल अशा पंधरा फूट बंधाऱ्यांमध्ये पडले. या बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गाळ असल्याने या गाळात अडकून बसल्याने त्यांना वर येता आले नाही व त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पथक व ग्रामस्थांनी त्या ठिकाणी धाव घेतली व विलास पानसरे यांचा मृतदेह बाहेर काढत शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला.

मयत पानसरे यांच्या पाठीमागे पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. घटनास्थळी नायब तहसीलदार यादव दळवी, मंडलाधिकारी प्रताप कळसे, तलाठी विनायक दिक्षे, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, माजी पंचायत समिती उप सभापती डॉ. दिलीप पवार, सरपंच पोपट ढगे यांनी भेट दिली.

## एमआयडीसी कामगाराची गळफास घेत आत्महत्या

नगर – घराच्या छताला असलेल्या लोखंडी हुकला गळफास घेऊन ३० वर्षीय परप्रांतीय कामगाराने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील केकताई रोड वरील, विखे पाटील कॉलेज मागे, डोंगरे वस्ती येथील बाळासाहेब शेवाळे यांच्या भाडोत्री खोलीमध्ये १६ जून रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली. महेंद्र कुमार भारती (रा. गाझीपुर, राज्य उत्तर प्रदेश) असे मयताचे नाव आहे.

महेंद्र कुमार भारती याने तो सध्या राहत असलेल्या भाडोत्री खोलीमध्ये छताला गळफास घेतल्याची बाब निदर्शनास येताच त्यास खासगी म्बुलन्सने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचाराकरीता दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.

या प्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांच्या अहवालावरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस हवालदार पितळे हे करीत आहेत.



गोविंदपुरा येथील मुख्य रस्त्यालगत मोकळ्या प्लॉटवर आणून टाकण्यात येत असलेला कचरा व प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरून आणून टाकलेले ॲनिमल वेस्ट छायाचित्रात दिसत आहे.

## कर्जदारास १ महिना कैद व ९०,००० रुपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार गंगु लक्ष्मण शिंदे, रा. गुलमोहोर रोड, सावेडी, अहिल्यानगर हिस निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून १ महिना कैद व ९०,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. गंगु लक्ष्मण शिंदे यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने गंगु लक्ष्मण शिंदे यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार गंगु लक्ष्मण शिंदे यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे, ॲड. विजय केदार, ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

## योगीताबाई मुनोत यांचे अल्प आजाराने निधन

नगर – विनायकनगर अहिल्यानगर येथील रहिवासी सौ. योगीता प्रविण मुनोत (वय ४५) यांचे १५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. विखे पाटील हॉस्पिटल येथे त्यांचे देहदान करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, १ मुलगी, सासु असा परिवार आहे. शिशु संगोपन संस्थेचे सेक्रेटरी श्री. कासवा यांच्या त्या कन्या होत तसेच प्रविण मुनोत यांच्या पत्नी होत.

# लक्ष्मीबाई भाऊरावमध्ये वाद्यांच्या गजरात फुलांच्या वर्षावाने विद्यार्थ्यांचे स्वागत

### कार्टूनसह हस्तांदोलन करुन विद्यार्थ्यांनी एकच धमाल; आकाशात फुगे सोडून जल्लोष

नगर – शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी १६ जून रोजी कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक शाळेत पारंपारिक ढोल–ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे आगमन झाले. विद्यार्थ्यांचे खास आकर्षण असलेले कार्टून त्यांच्या स्वागतासाठी उभे होते. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात आवडत्या कार्टूनसह हस्तांदोलन करुन विद्यार्थ्यांनी एकच धमाल आणि जल्लोष केला.



शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक शाळेत पारंपारिक ढोल–ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे आगमन झाले.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर, ज्ञानदेव पांडुळे, अर्जुनराव पोकळे, अंबादास गारुडकर, श्यामराव व्यवहारे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी लंके, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे आदींसह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रारंभी विद्यार्थांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मुलांच्या उपस्थितीमध्ये पाहुण्यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडण्यात आले. शाळेत एकत्र आलेल्या मित्र–मैत्रिणींनी पहिला दिवस साजरा केला.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण होण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती देऊन शाळेचा वाढता गुणवत्तेचा आलेख सादर केला. यावेळी विद्यार्थ्यांना सम्रग शिक्षा अभियानातंर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### परिधान करा चांदीचे दागीने

आजच्या तरुणाईमध्ये चांदीचे दागिने घालण्याची इच्छा निर्माण झाली आहे. लोक या सर्वांसह पायल, चेन, कानातले आणि बांगड्या घालतात. चांदी केवळ सौंदर्यच वाढवत नाही तर आरोग्याचीही विशेष काळजी घेते. चांदीचा संबंध चंद्राशी असल्याचे म्हटले जाते. अशा परिस्थितीत चंद्राचे दागिने घालण्याचे फायदे आरोग्यावर खूप चांगला परिणाम करतात. चांदीमध्ये असलेले अँटी-एजिंग गुणधर्म त्वचेच्या आरोग्याची विशेष काळजी घेतात. त्वचेचे आरोग्य सुधारून बारीक रेषा आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत करतात. इतकेच नाही तर चांदीमध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-व्हायरल गुणधर्म त्वचेवर हानिकारक बॅक्टेरियांची वाढ रोखण्यास मदत करतात. ज्यामुळे त्वचेची जळजळ आणि लालसरपणाची समस्या कमी होते. त्याचप्रमाणे शरीराची रोगप्रतिकार शक्तीही मजबूत होते.

## पाककला

### कांदा उत्तप्पा

**साहित्य :** २ वाट्या तांदूळ आणि एक वाटी उडदाची डाळ ६-७ तास भिजवून, वाटून वाटलेले मिश्रण ६-७ तास फरमेंट केलेले असावे, बारीक चिरलेले २ मोठे कांदे, बारिक चिरलेल्या ४-५ हिरव्या मिरच्या, बारीक चिरलेली मुठभर कोथिंबीर, २ टोमॅटो, गरजेनुसार तेल, मीठ चवीनुसार

**कृती :** फरमेंट केलेल्या पिठात मीठ घालून घ्या. कांदा, टोमॅटो, मिरच्या, कोथिंबीर एकत्र करून त्यात मीठ घालावे. नॉनस्टिक तव्यावर तेल सोडून २ पळ्या पिठ पसरून त्यावर कांदा टोमॅटोचे मिश्रण घालावे. दोन्हीकडून खमंग भाजून चटणीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### हे शुभ की अशुभ

जर तुमच्या घरात कबुतराने घरटे बनवले असेल तर कबुतर वारंवार घरात येत राहतात, ज्यामुळे घरात घाण पसरते आणि वातावरण खराब होते. त्यामुळे घरातील सुख-समृद्धीमध्ये अडथळे निर्माण होतात. कबुतराने घरात कुठेही घरटे बनवले तर ते फारच अशुभ मानले जाते. घरामध्ये कबुतराचे घरटे बनवणे अशुभ सूचित करते, यामुळे घरात आर्थिक संकट निर्माण होते. यामुळे कुटुंबातील सदस्यांच्या प्रगती आणि यशात अडथळे निर्माण होतात. अशा स्थितीत घरटे ताबडतोब काढून टाकणे तुमच्यासाठी चांगले राहील.

## सल्ला

* कांदा कापताना डोळे चुरचुरत असतील तर पंधरा मिनीटे आधी कांदा सोलून त्याचे दोन तुकडे करा आणि पाण्यात भिजत ठेवा.
* कांद्याची साल डोक्यावर अथवा कानाजवळ ठेवल्यास कांदा डोळ्यांना झोंबत नाही.

## सौंदर्य

हिवाळ्यात तेल त्वचेला कोरडे होण्यापासून वाचवते. महागड्या क्रिम्सऐवजी नारळ किंवा सूर्यफूल तेल लावून त्वचा मऊ ठेवू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १७ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, शततारा २५।०२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** तुम्ही स्वतःशी संबंधित कोणतीही माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीला देऊ नये. तुमच्या भूतकाळातील काही चुकांमधून तुम्हाला धडा घ्यावा लागेल.

**वृषभ :** रखडलेले काम पूर्ण होईल. आजचा दिवस इतर दिवसांपेक्षा चांगला राहणार आहे. रखडलेले काम पूर्ण झाल्याने तुमचे मन आनंदी होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित परिणामांचा असेल.

**मिथुन :** अडकलेले पैसे अचानक मिळाल्यानंतर तुम्ही खूप आनंदी व्हाल. जर तुमच्या भावंडांसोबत वाद झाला असेल तर तुम्हाला त्यासाठी माफी मागावी लागू शकते.

**कर्क :** कोणतेही नवीन काम सुरू करताना त्यामध्ये कोणत्याही बाहेरील व्यक्तीचा सल्ला घेऊ नका. कुटुंबातील एखाद्या सदस्याला नोकरीसाठी बाहेरगावी जावे लागू शकते.

**सिंह :** पद व प्रतिष्ठा वाढेल. आजचा दिवस तुमच्यासाठी तणावपूर्ण राहणार आहे. नोकरी करणारे लोक त्यांच्या अनुभवांचा पुरेपूर फायदा घेतील.

**कन्या :** प्रेमीकांमध्ये काही कारणांमुळे दोघांमध्ये तणावाचा सामना करावा लागू शकतो. आज तुमचे पद आणि प्रतिष्ठा वाढल्यामुळे तुम्ही आनंदी व्हाल.

**तूळ :** तुमचा एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो, त्याच्याशी बोलून तुम्हाला आनंद होईल.

**वृश्चिक :** व्यावसायिक खुश असतील. आजचा दिवस आरोग्याच्या बाबतीत थोडा कमकुवत राहणार आहे. आजचा दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे.

**धनु :** व्यवसाय करणारे लोक त्यांच्या कामावर खूश असतील आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाशी संबंधित चांगली माहिती मिळू शकेल.


**मकर :** जर तुम्ही एखाद्याला पैसे उधार दिले असतील तर ते तुम्हाला परत मिळू शकतात. तुम्हाला सध्याच्या आरोग्य समस्यांकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. उत्पन्नात वाढ होईल.

**कुंभ :** तुम्हाला तुमची दीर्घकाळ प्रलंबित कामे वेळेवर पूर्ण करावी लागतील अन्यथा पुढे जाऊन त्रास होऊ शकतो. गुंतवणूक करण्यापूर्वी विचार करा.

**मीन :** तुमची नवीन मालमत्ता घेण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते परंतु यामध्ये तुम्ही वडीलधाऱ्या सदस्यांशी बोलून कागदपत्रे खूप काळजीपूर्वक तयार करावीत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२०० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१९९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) काजळ; सुरमा; कज्जल ४) गणनायक; गजानन गजवदन ६) दारावरचा पहारेकरी ८) आकाशात उंच घेतलेली झेप १२) सायंकाळ; संध्याकाळ १३) सावकाश; मंद; धिमा १४) पडणे; पतन १५) गंध; राहणे १६) छताच्या काठास लावतात त्या रंगीबेरंगी कापडांच्या नक्षीदार चुण्या १७) आशीर्वाद; नवरामुलगा १८) वचक; दरारा; जरब १९) नदीकाठी पायऱ्या बांधून केलेली रचना; डोंगरातील नागमोडी रस्ता २०) परेशान; त्रस्त २१) गवळ्याची पत्नी

**उभे शब्द :-** १) कयास; तर्क; अनुमान; अदमास २) तापामुळे तोंडापाशी उठणाऱ्या बारीक पुटकुळ्या ३) नव्याने आलेला ५) अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तू ७) 'शेरीफ'चे मराठी रूप ९) अलीकडे; अलीकडील १०) फट; भेग; तडा ११) रीतीला धरून; पद्धतशीर १२) विडा या पदार्थामुळे रंगतो १३) कामबंद आंदोलन; हरताळ १५) चक्राकार फिरणारा वारा; वातचक्र १६) डबा वगैरे बंद करण्याचे साधन १८) जमिनीचा सारा; धान्याचे दर; नदीचा प्रवाह १९) आघात; जखम; वार

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आमच्या घरात देवघर आहे असे म्हणण्यापेक्षा देवाने दिलेल्या घरात आम्ही राहतो ही भावना असावी.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आंघोळ करताना कपडे घालावेत का?

भारतात लोक बहुतेकदा कपडे घालून आंघोळ करतात परंतु पाश्चात्य देशांमध्ये बहुतेक लोक कपड्यांशिवाय आंघोळ करतात. भारतीय धर्मग्रंथांमध्ये कपड्यांशिवाय आंघोळ करण्यास मनाई आहे. म्हणूनच येथील बहुतेक लोक बाथरूममध्येही कपड्यांसह आंघोळ करतात. आंघोळीबद्दल मर्यादित वैज्ञानिक संशोधन झाले आहे. तथापि, नग्न आंघोळीचे अनेक आरोग्य आणि मानसिक फायदे सांगितले आहेत.

बाथरूममध्ये नग्न आंघोळ केल्याने खाजगी भाग व्यवस्थित स्वच्छ होतात आणि जर काही बदल झाला तर तो देखील दिसून येतो. कपड्यांशिवाय आंघोळ केल्याने मानसिक फायदे होतात. त्यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि तणाव आणि चिंता देखील कमी होऊ शकते. एका संशोधनानुसार, यामुळे वजन कमी होऊ शकते कारण स्वतःचे वजन जास्त असल्याचे पाहिल्याने वजन कमी करण्यास प्रोत्साहन मिळते.

याबाबत दुसरी एक मनोरंजक कथा म्हणजे पूर्वी बाथरूम घराच्या मागील बाजूस होती. स्वच्छतागृहांना खिडक्याही नव्हत्या. आंघोळ करताना शौचालयात साप किंवा किडा शिरला तर ती व्यक्ती तशा अवस्थेत बाथरूममधून बाहेर येऊ शकत नाही. म्हणूनच किमान एक कपडा घाला असं म्हटलं जाते. ही पद्धत सुरू ठेवल्याचंही सांगण्यात येत आहे.

### मुर्तीपुजेचे महत्त्व

स्वामी विवेकानंद भ्रमंती करत असेच एकदा उत्तरेकडील अलवार संस्थानात गेले. त्यांचे प्रवचन ऐकायला गेलेल्या त्या संस्थानच्या दिवाणांनी प्रभावित होऊन त्यांना राजवाड्यावर नेले आणि त्यांची राजा मंगलसिंह यांची भेट घडवून आणली. राजाचे आयुष्य चैनीत चालले होते. शिवाय त्याच्या मनात राजेपणाचा अहंकारही होता. विवेकानंदाना पाहून त्याला वाटले, बोलून चालून हा एक तरुण संन्याशी ! इंग्रजीत प्रवचन देत असला, तरी याचा अनुभव तो किती असणार ? आपण याची फिरकी घ्यावी, असा विचार करून तो म्हणाला,

'स्वामीजी, मूर्तीपूजा म्हणजे शुद्ध अडाणीपणा आहे, असे मी मानतो. एखाद्या मूर्तीला हळदकुंकू आणि फुले वाहतांना तसेच तिच्यापुढे हात जोडतांना लोकांना पाहिले की, मला त्यांची कीव येते. याबाबतीत तुमचे काय मत आहे ?' राजाच्या या प्रश्नाला सरळ उत्तर न देता स्वामी दिवाणजींना म्हणाले, 'दिवाणजी, भिंतीवर टांगलेल्या चित्रावर थुंकून येता का ?' स्वामींच्या तोंडचे हे वाक्य ऐकून दिवाणजींना कापरेच भरले.

या रागाने लालबुंद झालेल्या राजाच्या चेहऱ्याकडे एकवार चोरट्या नजरेने बघून दिवाणजी म्हणाले, 'स्वामी काय बोलता हे ? ते महाराजांचे दिवंगत वडील आहेत !'

विवेकानंद म्हणाले, 'दिवाणजी, तो तर काळ्या शाईने रंगवलेला एक जाड कागद आहे'. एवढे बोलून ते राजाला उद्देशून म्हणाले, 'राजेसाहेब, त्या चित्रात अस्थी, मांस आणि जीव असलेले आपले वडील नाहीत; म्हणून त्याला केवळ काळ्या रंगाने रंगवलेला जाड कागद असे म्हणणे जेवढे अविचाराचे आहे, तेवढेच मूर्तीत प्रत्यक्ष देव नसतांना तिला देव मानून तिची पूजा करणाऱ्यांची कीव करणे अविचाराचे आहे. मूर्ती म्हणजे देव नव्हे, हे त्या मूर्तीची पूजा करणारे ज्ञानी भक्त जाणतात; परंतु निर्गुण, निराकार परमेश्वराची ध्यानधारणा करणे, ही सर्वसामान्यांना जमणारी गोष्ट नसल्याने, त्यांना ईश्वरभक्ती करता यावी, यासाठी मूर्तीपूजा ही प्रारंभीची पायरी आहे. यातूनच पुढे तो परमेश्वराशी एकरूप होण्याचे ध्येय साध्य करू शकतो'. हे ऐकून राजा अंतर्मुख होऊन विचारात पडला व त्यांचा अहंकारही गळून पडला.

# जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

उसके प्रति कृतज्ञ हैं। मैं आपकी प्रेम से की गई सेवा की कद्र करता हूँ, जो कि आप सतुगुरु के उद्देश्य की पूर्ति के लिए, अर्थात् लड़खड़ाती मानवता को पवित्र रास्ता दिखाने के लिए कर रहे हैं। यह सर्वोच्च किस्म की सेवा है, जो कि हम किसी इंसान के लिए कर सकते हैं, और असल में यह खुद प्रभु की सेवा है।

उसके (सतगुरु के नाम में एकत्रित होना एक अनूठा सौभाग्य है, ताकि हम उसकी दया पा सकें और धार्मिक शिक्षाओं को समझ सकें।

पूर्ण शांति और खुशी का आधार है सही समझ, जो कि सतुगुरु की भेंट होती है। हम आपस में एक-दूसरे को सच्चा भाई-बहन समझें, जो कि एक साथ जिंदा सतुगुरु की दया और संरक्षण में, अपनी मुक्ति के लिए कार्य कर रहे हो ।

विश्वास पात्रता और सहनशीलता से प्रेममय सहयोग मिलता है और निस्वार्थ कोशिशें, शिष्य को आदर से भरी नम्रता प्रदान करती है, जो कि पवित्र रास्ते पर बहुत उपयोगी है।

आप अपने व्यापार में नियमित रूप से समय लगा सकते हैं और इसे सतुगुरु का ही एक पवित्र कार्य समझ सकते हैं। जिस भी सहायता या मार्गदर्शन की जरूरत होगी, वह आपको ऊपर से मिलेगी। सत्संग वह पवित्र जगह होती है, जहाँ रूहानी पहलवान बनाए जाते हैं। यहाँ पर

गुरु-शक्ति की दया - मेहर से, सभी एकत्रित लोगों को, उनके आध्यात्मिक विकास के लिए, जिंदगी का जबरदस्त उभार मिलता है।

जब हम सच्चाई के रास्ते पर चलते हैं, तो हम पाते हैं कि हम निपुणता से बहुत दूर हैं। निपुणता धीरे-धीरे आती है और इसमें समय लगता है। अगर हम प्रभु और अपने भाई-बंधुओं से प्रेम करते हैं, तो इस बात से कोई फर्क नहीं पड़ता कि हम किस पंथ से जुड़े हैं, क्योंकि प्रभु की बादशाहत में प्रवेश के लिए जरूरी पारपत्र (पासपोर्ट) हमारे हृदय में बसा प्रेम है। यदि हम मनोविज्ञान के शिष्य हैं और मन के नियमों से परिचित हैं. पर अपने साथियों के प्रति प्रेम और दया से रहित हैं, तो हम अभी प्रभु की बादशाहत से बाहर हैं। हम क्या हैं, उसी के आधार पर हमारी आत्मा का दरवाजा प्रभु के लिए खुलता है और हम दूसरों की सहायता के लिए प्रभु का माध्यम बनते हैं।

कुछ लोग सुदूर आसमान में स्वर्ग की कल्पना करते हैं, पर स्वर्ग तो इसी जिंदगी में हमारी चेतनता की हालत का नाम है। यदि हम दिव्य जिंदगी जीना और प्रेम करना सीख जाएँ तो हम पहले से ही परलोक के स्वर्ग के नागरिक बन जाते हैं। प्रभु का साम्राज्य हमारी चेतनता की वह स्थिति है, जिसमें हम प्रभु से अपने पूरे दिल, अपने पूरे मन और अपनी पूरी ताकत से प्रेम करते हैं और अपने पड़ौसी से भी अपने जैसा ही प्रेम करते हैं ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

यह ग्रंथि पृथ्वी की गति से मेलजोल रखती है। जब सुबह के दो बजते हैं तो उस समय सबसे अधिक आरामदायक स्थिति में होती है और बहुत लाभदायक मेलाटोनिन नाम का हारमोन छोड़ती है। भौतिक स्तर पर पीनियल ग्रंथि को प्रभावित करने का कोई तरीका नहीं है। यह सिर्फ भगवान की याद से ही एक्टिवेट होती है। अगोचरी मुद्रा, शाम्भवी मुद्रा और खेचरी मुद्रा से भी इसे जागृत किया जा सकता है। ये मुद्राएं आप इंटेरनेट पर सर्च कर सकते हैं।

आज्ञा चक्र -१२-अगोचरी

नाक से चार ऊँगली दूर शून्य में बिंदू पर ध्यान लगाना होता है। सांस और मन का एक दूसरे से सम्बन्ध है। सांस धीरे धीरे हो तो विचार भी धीरे धीरे चलते हैं। सांस तेज हो तो मन भी तेज चलता है। शून्य में देखने से एनर्जी का केन्द्र बन जाता है जो पीनियल ग्रंथि को जागृत करता है।

आज्ञा चक्र - १३- खेचरी मुद्रा

भगवान से मिलने की यह हाट लाइन है। अगर इस ढंग से योग लगा सकें तो तुरंत सारी ईश्वर की शक्तियां प्राप्त कर सकते हैं। जीभ

उल्टी कर के गले में जो छोटी सी कंठी लटकती रहती है उस पर लगानी होती है। जीभ को यहां लगा कर भगवान को याद करने से तुरंत योग की दिव्य अनुभूति होती है। मन एकाग्र हो जाता है। आम आदमी जीभ उल्टी कर के कन्ठि में नहीं लगा सकता। जीभ को यहां लगाने के लिये कई हठ करने पड़ते हैं जो कि योग्य शिक्षक की देख रेख में होना चाहिये। योग्य शिक्षक मिलना मुश्किल है। अतः इस का अभ्यास ना करें। इस के लिये अभी आप कल्पना में समझो आप ने जीभ उल्टी करके कन्ठि पर लगा रखी है और बिंदू भगवान को याद करो। बहुत अच्छी अनुभूति होगी। फिर भी यह रिसर्च का विषय है कि कितना फायदा होता है और इसे भगवान से मिलने की हाट लाइन क्यों कहते हैं। कुछ तो जरूर है। आप जितना हो सके उतना जीभ को कन्ठि की ओर मोड़ कर याद करें। धीरे धीरे अभ्यास से जीभ कन्ठि पर भी लगने लग सकती है।

भगवान को याद करते समय मुंह सीधा रखें परंतु आंखो से ऊपर भृकुटी में देखें। यह क्रिया पीनियल ग्रंथि पर सीधा असर करती है। क्योंकि मन की एनर्जी आंखो के द्वारा जो बाहर नष्ट होती है वह वापिस आज्ञा केन्द्र में प्रवाहित होने लगती है जिस से शक्ति एक चक्र में घूमने लगती है और बहुत तीव्र हो जाती है और सुखद अनुभूतियां होने लगती हैं।

आज्ञा चक्र -१६ पीनियल ग्रंथी - मेलाटोनिन हार्मोन - मेलाटोनिन हार्मोन दिमाग में स्वतः स्त्रावित होता है और चैन की नींद देता है। अगर इस हार्मोन का स्त्राव भरपूर ना हो तो नींद न आने की समस्या होती है। सुबह की शानदार शुरुआत तभी हो सकती है जब रात को चैन भरी नींद आये। अनियमित दिनचर्या, तनाव और अवसाद से इस का स्त्राव कम हो जाता है जिस से नींद दूर हो जाती है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**टीचर** - लड़कियां अगर पराया धन होती है तो लड़के क्या होते है??
**गप्पू** - सर चोर होते है! **टीचर** - वो कैसे??
**गप्पू** - क्योकि चोरों की नजर हमेशा पराये धन पर होती है।

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाला कोणाचे नाव देण्यात आले?
- रतन टाटा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

पुढील काळात स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण जगाला प्रवचनाद्वारे मार्गदर्शन केले. त्यांनी सुद्धा आयुष्यभर त्यांना घडविण्यामध्ये आईलाच श्रेय दिले. चंदन, गुलाब, अवतमूळ, वाळा, अगरू, हळद, मसुराचा डाळ याच वस्त्रगाळ पूर्ण पुपाप्पा सायीमध्ये भिजवून त्याचे मिश्रण बालिकेला खालून वर असे उलट्या दिशेने लावावे. असे उटणे लावून अंघोळ घातल्यास त्वचेवरील लव नाहीशी होईल. संध्याकाळीही अंघोळ घालून कपडे बदलावेत. आईने स्वत: तिच्या बाह्य जननेंद्रियाचा भाग स्वच्छ करावा.

### बालकांचे आजार

शारीरिक स्वच्छतेच्या बाबतीत मार्गदर्शन करावे. बाह्य जननेंद्रियांची स्वच्छता करताना बृहदओष्ठ, लघुओष्ठ मोकळे करावेत. शौच व लघवी झाल्यानंतर ती जागा पाण्याने स्वच्छ धुवावी. शौच झाल्यानंतर आपण गुदद्वाराची जागा मागून पुढे धुतो. त्यामुळे शौचाचे जंतू मूत्रमार्गात जाऊन जंतुसंसर्ग होतो. बाह्य जननेंद्रियाची स्वच्छता ठेवली नाही आणि आतील कपडेही स्वच्छ नसतील तरी जंतुसंसर्ग होतो. योनिभाग लाल होऊन खाज सुटते. सूज येते. बृहदओष्ठ, लघुओष्ठ एकमेकांना चिकटतात. अशा वेळी बालिका वारंवार योनिभागी खाजवते. मूत्रमार्गाचा जंतुसंसर्ग झाल्यास ताप येणे, लघवीला जळजळ होणे, किरकिर करणे ही लक्षणे दिसतात. मूत्रमार्गाचा व योनिमार्गाचा जंतुसंसर्ग जंतुनाशक औषधांचा वापर करून बरा होतो. परंतु त्याचबरोबर त्या भागाची नियमित काळजी घ्यावी. स्वच्छता न ठेवल्यास हा आजार वारंवार होत राहतो; याकरिता डॉक्टरांचे वेळोवेळी मार्गदर्शन घ्यावे.

त्यांनी सुद्धा आयुष्यभर त्यांना घडविण्यामध्ये आईलाच श्रेय दिले. या आणि जर - लता मंगेशकरांचे वडील दीनानाथ मंगेशकर हे गायनाचे वर्ग चालवित होते. लतादीदींच्या बहिणी आशा, उषा, मीना व त्यांचा भाऊ हृदयनाथ हे सर्वजण आज संगीताच्या क्षेत्रात यशस्वी गायक आहेत. माई मंगेशकरांबरोबरच दीनानाथ मंगेशकरांचाही या मुलांना घडविण्यात, संगीताचे संस्कार करण्यात मोठा वाटा आहे. आज त्यामुळेच या भावंडांनी संगीत क्षेत्रात सर्व विश्वात नावलौकिक मिळविला आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रभाग १५ मध्ये टाकी स्वच्छतेचे काम सुरू

## प्रशासनाला जागं करायचं असेल तर आंदोलनाशिवाय पर्याय नाही : दत्ता जाधव

नगर – अहिल्यानगर प्रभाग क्रमांक १५ मध्ये गेल्या काही दिवसांपासून मैला–मिश्रित पाण्याचा प्रचंड त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता. संजयनगर, काटवन खंडोबा परिसर, व्यवहारे मळा, गायके मळा, गवळीवाडा, संभाजी कॉलनी, स्टेशन रोड परिसर, आगरकर मळा अशा अनेक भागांमध्ये नळाला येणारे पाणी दुर्गंधीयुक्त, गढूळ आणि आरोग्याला घातक स्वरूपाचे येत होते. यामुळे परिसरातील अनेक नागरिकांना डेंगू, कावीळ, चिकनगुनिया, टायफॉईड, उलटी, जुलाब, त्वचाविकार अशा गंभीर आजारांचा सामना करावा लागला. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत अनेक जण आजारी पडले असून काहींना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. या परिस्थितीमुळे नगरसेवक दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दीपक खैरे, ओंकार शिंदे, निलेश जाधव, शकीलभाई यांनी एकत्र येत मनपाच्या पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी आणि मनपा आयुक्तांना थेट मैलमिश्रित पाण्याच्या बॉटल भेट दिल्या आणि आंदोलन छेडले.



प्रभाग १५ मध्ये टाकी स्वच्छतेचे काम सुरू करण्यात आले. यावेळी कामाची पहाणी करताना दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दीपक खैरे, ओंकार शिंदे, निलेश जाधव, शकीलभाई, अभियंता राहुल गीते आणि अभियंता शेजवळ आदी.

या आंदोलनाची तात्काळ दखल घेण्यात आली. आंदोलनानंतर मनपाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रभाग १५ मधील पाण्याची टाकी तातडीने स्वच्छ करण्याचे काम हाती घेतले. या वेळी अभियंता राहुल गीते आणि अभियंता शेजवळ यांच्यासह संपूर्ण मनपा कर्मचार्यांची टीम हजर होती.

यावेळी बोलताना दत्ता जाधव म्हणाले की, प्रभागातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासून गढूळ पाण्यामुळे त्रस्त होते. बालकांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांना आजार झाले. काहींवर उपचार सुरू आहेत. ही परिस्थिती असह्य झाली होती. आम्ही वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष होत होते. अखेर अधिकार्यांना गढूळ पाण्याची बॉटल देऊन आम्ही त्यांना वास्तवाची जाणीव करून दिली. नागरिकांचे आरोग्य हे सर्वोच्च आहे. यापुढेही जर पाण्याच्या गुणवत्तेत हलगर्जीपणा झाला तर आम्ही अधिक तीव्र आंदोलन करू. जनतेसाठी मी आणि माझे सहकारी कायम सज्ज आहोत.

# कोहिनूर ड्रायव्हिंग स्कूल व सिध्दी अॅडव्हर्टायझिंगतर्फे 'शुध्द शाकाहारी टिफीन बनवा स्पर्धेचे' आयोजन



नगर – कोहिनूर ड्रायव्हिंग स्कूल व सिध्दी अॅडव्हर्टायझिंगतर्फे शुध्द शाकाहारी टिफीन बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती स्कूलच्या संचालिका सौ. मयुरी सावदेकर व अॅडव्हर्टायझिंगच्या संचालिका सौ.स्वाती गांधी यांनी दिली.

त्या म्हणाल्या, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. घरातील लहान मुलांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना आवडेल असा चवीचा रूचकर आणि पौष्टीक टिफिन बनविणे गृहिणींसाठी नेहमीच आव्हान असते. शाळा, कॉलेज सुरु झाल्याने मुलांसाठी सहज आवडेल आणि सर्व पोषक घटक असतील असे टिफिन बनविण्यासाठी गृहिणी सज्ज झाल्या आहेत. म्हणूनच या टिफीन बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शुध्द शाकाहारी सर्वोत्कृष्ट टिफिन रेसिपींना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.

लहान मुलांना जंक फुड, फास्ट फूड खूप आवडते. परंतु, अशा फास्टफुडमुळे शरीराचे नुकसान होते. पोषण मूल्यांचा अभाव असल्याने हे अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर शरीराला आवश्यक ऊर्जादायी घटक मिळत नाहीत. त्यामुळे घरातच भाज्या, फळभाज्या, सलाड, हिरव्या पालेभाज्या, विविध प्रकारच्या डाळी वापरुन मुलांना चविष्ट लागेल असे पदार्थ टिफिनमध्ये दिले तर मुले आनंदात जेवण करतील व त्यांच्या वाढीसाठी आवश्यक पोषण मूल्येही त्यांना मिळतील. प्रत्येक गृहिणीकडे अशा टिफीनची संकल्पना असते. याच पाककौशल्याला वाव देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मातांनी आपली रेसिपी व तयार टिफीनचा फोटो २२ जूनपर्यंत कोहिनूर ड्रायव्हिंग स्कूल, जी२, सावन प्लाझा, बँक ऑफ बडोदाजवळ, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर येथे पाठवावेत. प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येतील तसेच दोन उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येणार आहेत. याशिवाय प्रत्येक सहभागी स्पर्धकाला आकर्षक गिफ्ट देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त सिंदखेड राजा (जन्मस्थळ) ते पाचाड (स्मृतीस्थळ) अशी अभिवादन यात्रेचे नगरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने स्वागत करण्यात आले.

# मातृतीर्थ सिंदखेड राजा ते पाचाड (रायगड) अभिवादन यात्रेचे स्वागत

नगर – राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त सिंदखेड राजा (जन्मस्थळ) ते पाचाड (स्मृतीस्थळ) अशी अभिवादन यात्रेचे नगरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी व्हाईस चेअरमन बाळकृष्ण काळे, संचालक किसनराव पायमोडे, उदय अनभुले, संयोजक द्वारकाधीश राजेभोसले, ज्ञानदेव पांडूळे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, शिवाजी राजे जाधव, नगरसेवक अजय चितळे, संतोष गेनपा, सुधीर लांडगे, राजेश परकाळे, अतुल लहारे, इंजि.श्रीकांत निंबाळकर, केदारनाथ राजेभोसले, अॅड.जय भोसले, अशोक वारकड, अमोल लहारे, दत्ता साठे, शशिकांत भांबरे, मिलिंद जपे, अच्युत गाडे, गजेंद्र दांगट, राजेंद्र ससे, निलेश म्हसे, संजय चव्हाण आदी उपस्थित होते. या यात्रेचे मुख्य आयोजक व जिजाऊंचे वंशज शिवाजीराजे जाधव यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

१७ जून राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा स्मृतिदिन याचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही अभिवादन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा नगरमध्ये आली असता, रविवारी रात्री अहिल्यानगर शहरात जाधव लॉन, कल्याण रोड, अ. नगर या ठिकाणी आगमन झाले. त्या ठिकाणी यात्रेचे स्वागत करण्यात आले. सोमवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक, एस. टी. स्टॅण्ड, नगर येथे महाराजांना अभिवादन करून यात्रा पुढे मार्गस्थ झाली.

यावेळी शिवशंभु भक्त व मराठा सेवा संघ, मराठा पतसंस्था, राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान, चौपाटी कारंजा मित्र परिवार आदीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा

### यशवंत डांगे यांचे आवाहन; मनपातर्फे डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियान सुरू, पथके दर आठवड्याला १ हजार घरांना भेटी देऊन सर्वेक्षण करणार

नगर – महापालिकेच्या वतीने अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. त्याचाच भाग म्हणून नागरिकांच्या सहभागातून डेंगू मुक्त अहिल्यानगर अभियान दर रविवारी राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आरोग्य विभागाची पथके दर आठवड्याला १००० घरांना भेटी देऊन सर्वेक्षण व उपायोजना करणार आहेत. रविवार पासून या अभियानाला सुरुवात झाली आहे. डास आळींची उत्पत्ती रोखली जावी, यासाठी आठवड्यातून एक दिवस नागरिकांनी कोरडा दिवस पाळावा व या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



महानगरपालिकेच्यावतीने अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी डेंगू मुक्त अहिल्यानगर अभियान राबविण्यात येत आहे.

मागील वर्षे ही महानगरपालिकेच्या वतीने डेंगू मुक्त शहर अभियान राबवले होते. यात नागरिक व विविध संघटनेचा प्रतिसाद मिळाला होता. यावर्षी होणाऱ्या अभियानात आरोग्य विभागाचे १२ वैद्यकीय अधिकारी, १ साथरोग अधिकारी, १५ स्टाफ नर्स, ३५ एएनएम, ६ एमपीडब्ल्यू, १६ मलेरिया कर्मचारी, २५ आशा स्वयंसेविका असे ११० कर्मचारी अभियानाच्या माध्यमातून २० पथकांद्वारे १००० घरांतील ५००० लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करणार आहेत. १५ जून पासून हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

डेंग्यू पासून सावध राहण्यासाठी, डेंग्यूची डास अळीची उत्पत्ती रोखण्यासाठी जनजागृती करणे, डास अळी नियंत्रण कार्यक्रम, पाणीसाठ्यांची तपासणी, पाणी साठवले जाणारे अथवा दूषित पाणी साठलेले कंटेनर शोधून रिकामी करणे, पाण्यात अळीनाशक अॅबेट टाकणे, डास नाशक स्प्रेईंग करणे, डास अळी सापडलेल्या घरांवर स्टिकर लावणे, ताप सदृश्य रुग्णांचे सर्व्हेक्षण, मलेरिया स्लाईड घेणे, कार्यक्षेत्रात आरोग्य शिक्षण देणे, डास उत्पत्ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, नागरिकांमध्ये जनजागृतीकरिता माहितीपत्रके वाटप करणे आदी कार्यक्रम व उपक्रम या अभियानातून होणार आहेत. नागरिकांनीही या अभियानात सहभागी व्हावे. एक दिवस कोरडा दिवस पाळावा व स्वतःच्या घराची तपासणी करून साचललले पाणी काढून टाकावे, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

# गरजवंतांना मदत करणे हिच खरी समाजसेवा

## अॅड. विक्रम वाडेकर यांचे प्रतिपादन; विनय वाखुरे यांच्या सामजिक उपक्रमांचे नागरिकांकडून कौतुक

नगर – तहानलेल्यांना पाणी देणे, भुकेलेल्यांना अन्नदान करणे ही आपल्या भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. समाजात अनाथांचे नाथ होणे, गरजूंना मदत करणे, हा मानव धर्म आहे. ज्यांना ज्या गोष्टींची गरज आहे ती पूर्ण केली तर मदत घेणारा आनंदी होतो तर देणारा समाधानी असतो. समाजातील गरजवंतांना मदत करणे हीच खरी समाजसेवा आहे. या सेवेचे व्रत गेल्या अनेक वर्षांपासून सावेडी उपनगरातील विनायकराज प्रतिष्ठान जोपासत असुन हा एक स्तुत्य उपक्रम आहे, असे प्रतिपादन मोहटा देवी ट्रस्टचे विश्वस्त अॅड. विक्रम वाडेकर यांनी केले.



तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना विनायकराज प्रतिष्ठानच्यावतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी अॅड.विक्रम वाडेकर, विपुल वाखुरे, विनय वाखुरे प्रतिष्ठानचे सदस्य आदी (छाया – विजय मते)

सावेडी येथील विनायकराज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करीत समाजासाठी उपक्रम राबविले. या उपक्रमात सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील मुला–मुलींना शालेय साहित्य वाटप केले. याप्रसंगी अॅड. विक्रम वाडेकर, विपुल वाखुरे, विनय वाखुरे, अजय रासकर, अतुल देव्हारे, सागर ठाकूर, अनिल लगड, प्रदीप वाखुरे, पांडुरंग कोलते, आदित्य आढाव, प्रणव गांधी, अथर्व शेलार, अंकित धोत्रे, सिद्धार्थ सारडा, पवण पारिख, राज दळवी, विकास राऊत, किरण पंधाडे, सचिन कलंके, मयूर कुलकर्णी, महेश डोखे, सार्थक लोहार, अमित आव्हाड, कुणाल लाटे, अमोल खंडागळे, पार्थ दळवी, रुपेश कपिले, संग्राम केदार, निखिल कोल्हारे आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.

विनायक राज प्रतिष्ठानतर्फे सर्व रोग निदान आरोग्य तपासणीत तज्ञ डॉक्टरांकडून रक्त तपासणी, नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा प्रभागातील ७५० नागरिकांनी लाभ घेतला. ज्येष्ठ नागरिक, महिलांसह लहान मुलांचा सहभाग यामध्ये होता. तसेच युवा महाराष्ट्र मित्र मंडळाने गोशाळेत चारा वाटप करून बालघर प्रकल्पातील लहान मुला– मुलींची आरोग्य तपासणी केली. त्यांना खाऊचे वाटप करून वह्या वाटप करण्यात आल्या.



छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या वर्षा मंगल जलतरण स्पर्धेत अहिल्यानगरच्या कुलकर्णीज स्वीम अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारांमध्ये दैदिप्यमान यश मिळविले.

# वर्षा मंगल जलतरण स्पर्धेत कुलकर्णीज अकॅडमीची २० पदकांची कमाई

नगर – छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम स्पोर्टस् क्लब आयोजित वर्षा मंगल जलतरण स्पर्धेत अहिल्यानगरच्या सिद्धीबाग येथील स्व. अनिलभैय्या राठोड जलतरण तलाव येथील कुलकर्णीज स्वीम अँड रिसर्च अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारांमध्ये दैदिप्यमान यश मिळविले. या स्पर्धेत अकॅडमीच्या स्पर्धकांनी एकूण सहा सुवर्णपदके, आठ रौप्य पदके आणि सहा कांस्य पदके अशी वीस पदकांची कमाई केली आहे, अशी माहिती अकॅडमीचे संचालक गणेश कुलकर्णी यांनी दिली.

या स्पर्धेत ५० मीटर फ्री स्टाईल या प्रकारामध्ये रणविजय घोरपडे याने सुवर्ण पदक, श्रेया रावस व आरुष दातरंगे यांनी रौप्य पदक पटकावले व दिव्या सांगळे हिने कांस्यपदक मिळवले. ५० मीटर बॅकस्ट्रोक या प्रकारात वाल्मीक कुलकर्णी व चैत्राली धर्माधिकारी यांनी सुवर्णपदक, रणविजय घोरपडे व अर्णव गुंड यांनी रौप्यपदक तर श्लोक देशपांडे आणि श्रेया रावस यांनी कांस्यपदक पटकावले. ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक या प्रकारामध्ये रणविजय घोरपडे, अर्णव गुंड, धनश्री बडे, श्रेया रावस यांनी रौप्य पदक तर सोहम गुंड याने कांस्यपदक मिळवले, ५० मीटर बटरफ्लायमध्ये वाल्मीक कुलकर्णी, चैत्राली धर्माधिकारी व रणविजय घोरपडे यांनी सुवर्णपदक, अर्णव गुंड व श्लोक देशपांडे यांनी कांस्यपदक पटकावले.



'स्नेहबंध' तर्फे महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ चे वितरण करण्यात आले.

# 'स्नेहबंध'मुळे समाज कार्य करणाऱ्यांना बळ मिळेल

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' चे वितरण

नगर – स्नेहबंध सोशल फौंडेशनच्यावतीने देण्यात येणारे पुरस्कार समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना बळ मिळेल. यामुळे समाजकार्य करण्यासाठी नागरिक उत्स्फूर्ततेने पुढे येतील, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्यावतीने महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ च्या वितरण प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपवन संरक्षक धर्मवीर सालविठ्ठल हे होते. व्यासपीठावर पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, शिल्पकार प्रमोद कांबळे, अमित खामकर, स्नेहबंधचे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे उपस्थित होते. राज्यातील, जिल्ह्यातील विविध क्षेत्रात समाजहिताचे उल्लेखनीय काम करत असलेल्यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी स्नेहबंधच्या वतीने कला, क्रीडा, शिक्षण, पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक या क्षेत्रातील महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले.

आ. जगताप म्हणाले, डॉ. शिंदे हे वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, कामगारांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी टोपी, छत्री, ब्लँकेट वाटप, आरोग्य तपासणी शिबिर असे विविध उपक्रम राबवत आहेत. त्यांची समाजासाठी काम करण्याची धडपड ही कौतुकास्पद आहे.

उपवन संरक्षक सालविठ्ठल म्हणाले, डॉ. उद्धव शिंदे हे स्नेहबंधच्या माध्यमातून निस्वार्थपणे सामाजिक काम करत आहेत. आमच्या कार्यालयात त्यांचे दोन कार्यक्रम झाले. त्यांच्या कार्यास शुभेच्छा.

शिल्पकार प्रमोद कांबळे म्हणाले, आजच्या काळात कला साक्षर होणे खूप गरजेचे आहे. कारण कुठे काय हवे हे कलेची जाण असणारा बरोबर सांगू शकतो.

३० जणांना स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सुत्रसंचालन प्रतिक्षा सोनवणे यांनी केले. मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी आभार मानले.

# श्री गुरु हरगोविंद साहेबजी यांचा ४३० वा जन्मोत्सव भक्तिभावात

नगर – गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपूर येथे सिख धर्माचे सहावे गुरु श्री गुरु हरगोविंद साहेबजी यांचा ४३०वा जन्मोत्सव मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आणि पवाड्यांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये शहरातील तसेच इतर भागातील शेकडो भाविकांनी सहभाग घेतला. या पवित्र कार्यक्रमात पंजाब, लुधियाना येथून आलेले भाई सुखदेव सिंगजी आणि त्यांच्या ३ सहकारी बालिकांनी सादर केलेल्या भक्तिपूर्ण धार्मिक पवाड्यांनी उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण गुरुद्वारा परिसर वाहेगुरु च्या जयघोषांनी निनादला होता. गुरुद्वाराचे अध्यक्ष बलदेव सिंग वाही यांनी गुरु हरगोविंदजींच्या जीवनकार्याचा आढावा घेत सांगितले, गुरु हरगोविंदजींनी वयाच्या ११व्या वर्षी गुरुगादी स्वीकारली. वडील गुरु अर्जन देवजी यांच्या बलिदानानंतर त्यांनी अन्यायाविरुद्ध शस्त्र उचलले. 'मिरी आणि पिरी' या तत्त्वांचा प्रचार करून त्यांनी सिखांना राजकीय आणि आध्यात्मिक नेतृत्व दिले. श्री अकाल तख्त साहेब ची स्थापना करून सिख धर्मात पहिल्यांदाच राजकीय दृष्टिकोनाची जोड दिली.

## आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये अहिल्यानगरच्या युवकांची यशस्वी कामगिरी





गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपूर येथे सिख धर्माचे सहावे गुरु श्री गुरु हरगोविंद साहेबजी यांचा ४३०वा जन्मोत्सव मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगरच्या तरुणांची दक्षिण आफ्रिकेतील जागतिक मॅरेथॉनमध्ये ऐतिहासिक झेप. धार्मिक उत्सवासोबतच अहिल्यानगर शहराने क्रीडा क्षेत्रातही अभिमानास्पद यश संपादन केले आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या ९० किलोमीटरच्या पर्वतीय मॅरेथॉनमध्ये संपूर्ण जगातून २४ हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. भारतातून ४२५ स्पर्धक सहभागी झाले होते. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अहिल्यानगरचे भूषण भाटिया यांनी ही मॅरेथॉन ८ तास २४ मिनिटांत पूर्ण करत भारतभरात तिसरा क्रमांक पटकावला. त्यांच्या या गौरवशाली कामगिरीबद्दल त्यांचा गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच रितेश खंडेलवाल आणि सुनील बनकर यांनी देखील ही मॅरेथॉन ११ तास २५ मिनिटांत पूर्ण करत अत्यंत साहसी कामगिरी केली. या तीनही युवकांचे विशेष अभिनंदन करण्यात आले आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमास गुरुद्वारा समितीचे पदाधिकारी, क्रीडाप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या युवा धावपटूंनी शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे. यावेळी गुरुद्वाराच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# स्थैर्यनिधी संघाच्या अध्यक्षपदी शिवाजीराव कपाळे व उपाध्यक्षपदी अजिनाथ हजारे यांची बिनविरोध निवड

नगर – अहमदनगर जिल्हा पतसंस्था स्थैर्यनिधी सहकारी संघाची संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली. यानंतर शनिवारी झालेल्या नूतन संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीत चेअरमन व व्हाईट चेअरमन यांची निवड करण्यात आली. या बैठकीत नूतन अध्यक्षपदी शिवाजीराव कपाळे व उपाध्यक्षपदी अजिनाथ हजारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. चेअरमन पदासाठी वसुदेव काळे यांनी शिवाजी कपाळे यांचे नाव सुचवले त्यास ज्ञानदेव पाचपुते यांनी अनुमोदन दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमन पदासाठी अजिनाथ हजारे यांच्या नावाची शिफारस मिलिंद गंधे यांनी करून विठ्ठल अभंग यांनी त्यास अनुमोदन दिले. या संचालक मंडळाच्या बैठकीस स्थैर्यनिधी संघाचे मावळते अध्यक्ष सुरेश वाबळे, माजी उपाध्यक्ष वसंत लोढा, नूतन संचालक वसंत कवाद, उमेश मोरगावकर, पुखराज पिपाडा, आशुतोष पटवर्धन, राणीप्रसाद मुंदडा, राजेंद्र खटोड व श्रीमती सुशीला नवले आदी उपस्थित होते. यावेळी नूतन पदाधिकारी व संचालकांचा सत्कार करण्यात आला.



जिल्हा पतसंस्था स्थैर्यनिधी सहकारी संघाच्या नूतन अध्यक्षपदी शिवाजीराव कपाळे व उपाध्यक्षपदी अजिनाथ हजारे यांची बिनविरोध झाल्यावर त्यांचा सत्कार करताना सुरेश वाबळे व वसंत लोढा.

शिवाजीराव कपाळे म्हणाले, २०१० साली स्थापन झालेल्या स्थैर्यनिधी सहकारी संघाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पतसंस्थांचे अनेक प्रलंबित प्रश्न संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे व उपाध्यक्ष वसंत लोढा यांनी चांगल्या पद्धतीने काम करून सोडवले आहेत. आता माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याकडे अध्यक्षपदाची धुरा दिली आहे. सध्याच्या आव्हानात्मक काळात या पदाच्या माध्यमातून पतसंस्था चळवळीतील सर्व प्रश्न सोडवण्यास मी प्राधान्य देणार आहेत. जी प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन पतसंस्था फेडरेशनचे राज्याध्यक्ष काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली काम करणार आहे. ही पतसंस्था चळवळ अधिक पारदर्शी व मजबूत कशी होईल यासाठी मी प्राधान्य देणार आहे.

अजिनाथ हजारे म्हणाले, काका कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थैर्यनिधी सहकारी संघाचे उत्कृष्ट व आदर्शवत काम चालू आहे. हे काम अधिक वेगाने पुढे नेण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. जिल्ह्यातील सर्व पतसंस्था व स्थैर्यनिधी संघाच्या सभासद असलेल्या पतसंस्थांनी ही चळवळ अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे. सर्व संचालकांना विश्वासात घेऊन दिलेली जबाबदारी चोख पार पाडू.

सुरेश वाबळे म्हणाले, गेल्या पंधरा वर्षापासून स्थैर्यनिधी संघाचा अध्यक्ष म्हणून काम पाहिले. जिल्ह्यातील पतसंस्था चळवळ अधिक पारदर्शी, स्वच्छ व समस्यामुक्त होण्यासाठी प्रयत्न केले. त्यास चांगले यश आले आहे. पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली ही चळवळ पुढे नेली. आता शिवाजीराव कपाळे व अजिनाथ हजारे यांच्याकडे या चळवळीचा कारभार सोपवला आहे. हे दोघेही चांगले अनुभवी असल्याने आपली जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी वसंत लोढा यांनीही मनोगत व्यक्त करून आभार मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये २० जून रोजी हृदयरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन

## ३००० रूपयात अँन्जिओग्राफी होणार



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी म.सा. हॉस्पिटीलमध्ये २० जून रोजी हृदयरोग मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर २० जून रोजी सकाळी १० ते २ यावेळेत होणार आहे. कार्डिओलॉजीस्ट डॉ. राहुल अग्रवाल, डॉ.अमित थोपटे आणि डॉ.अनिकेत कटारिया हे शिबिरार्थींची तपासणी करणार आहेत.

महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत हृदय शस्त्रक्रिया व अँन्जिओप्लास्टी मोफत केल्या जाणार आहेत.तर अँन्जिओग्राफी फक्त ३००० रूपयात करण्यात येणार आहे. हल्लीच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनशैलीमुळे हृदयावर ताण येण्याचे प्रमाण वाढत चालले आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकीच्या सद्भावनेने हृदयरोग मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. तसेच महावीर भवन येथे रूग्ण आणि रूग्णांचे नातेवाईकांसाठी ३५ रूपयात भोजन सुविधा उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब आणि ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सुविधा उपलब्ध आहे.

शिबिराच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी ०२४१– २३२०४७३/७४/७५ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

# 'नीट २०२५ च्या परिक्षेमध्ये' अमेय बोरगेची उज्ज्वल कामगिरी



नगर – नीट २०२५ च्या परीक्षेत अमेय बोरगे याची उज्वल कामगिरी करत देशात १०४० व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहे. नीट २०२५ परीक्षेत त्याने ७२० पैकी ५०८ गुण मिळवत, ९८.०१ टक्के मिळवले आहे.

अमेय बोरगे जेजे सायन्स अकॅडमीचा विद्यार्थी आहे. या यशामागे पालक महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे व डॉ.सुरेखा बोरगे यांचे प्रोत्साहन, तसेच जेजे सायन्स अकॅडमीच्या शिक्षकांचे मार्गदर्शन आणि प्रयत्न देखील मोलाचे ठरले.


**लैंगिक समस्या??**

* लहान व पातळ लिंग
* वीर्य पातळ, नपुसकता
* सेक्स वेळेच्या अभाव * शिग्रपतन, स्वप्नदोष
* शुक्राणूंची कमतरता * सेक्स इच्छा नसणे
* चाळीसी नंतरची लैंगिक समस्या
* पुरुषांच्या सर्व लैंगिक आजारांवर




: संपर्क करा :
9823086760, 9326832281
(डॉ.अंबेकर एम.एस., MD. MSD

अहिल्यानगर येथे १७ जुन रोजी भेट.
नवीन पत्ता : सिटी सेक्स मार्गदर्शन व उपचार केंद्र. ६ वा मजला,ए ६१२, कोर्टयार्ड प्रोजेक्ट, तारकपूर बस स्टॉप समोर,तारकपूर.वेळ.. स १० ते ६.


# खाजगी शाळांतील शिक्षकांसाठी आश्वासित प्रगती योजना लागू करा

## तपासणी अहवाल सादर, आता शासन निर्णय निर्गमित करणे अत्यावश्यक

नगर – १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर शंभर टक्के वेतन अनुदान प्राप्त झालेल्या शिक्षक, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी तसेच राज्य राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शिक्षण सचिव व शिक्षण आयुक्तांना दिले आहे. तपासणी अहवाल सादर झालेला असून, आता मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करणे अत्यावश्यक असल्याचे शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी म्हंटले आहे.



बाबासाहेब बोडखे

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर शंभर टक्के वेतन अनुदान प्राप्त झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत तपासणी करण्याकरिता शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय १३ ऑगस्ट २०२४ अन्वये तपासणी समिती गठीत करण्यात आली. सदर तपासणी समितीला विषय बाबतचा अहवाल १ महिन्याच्या आत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार तपासणी समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करणे अत्यावश्यक व निकडीची आहे.

राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्याची शिफारस शासनास करण्याबाबत शासन निर्णय ३१ जुलै २०१९ अन्वये अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली. अभ्यास गटाची अंतिम बैठक ६ मार्च २०२० रोजी बालचित्रवाणी कार्यालय पुणे येथे घेण्यात आली. सदर अंतिम बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार अभ्यास गटाचा अंतिम अहवाल शिफारशीसह शासनास ८ मे २०२० रोजी सादर करण्यात आला. शासनाने अभ्यास गटाचा अंतिम अहवाल जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून शिक्षणाकांना तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेपासून वंचित ठेवले असल्याचा आरोप शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आला आहे. तर ही बाब शिक्षकांवर अन्यकारक आणि शिक्षण क्षेत्रात संताप निर्माण करणारी असल्याचे म्हटले आहे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर शंभर टक्के वेतन अनुदान प्राप्त झालेल्या शिक्षक, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी तसेच राज्य राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्याप्रकरणी मंत्रिमंडळाच्या बैठकीत तात्काळ निर्णय घेऊन घोषणा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# धनादेश अनादर प्रकरणात जामीनदारास ३ महिने कैद व ५,४०,००० रूपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने जामीनदार भुपेंद्र रजनीकांत निकम, रा. नागापुर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ३ महिने कैद व ५,४०,००० रूपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. रक्कम न भरल्यास १५ दिवस साधी कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना नुकसान भरपाई रक्कम रूपये ५,३७,००० देण्याचा आदेश दिलेला आहे. वैशाली भालेराव यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांच्याकडुन घेतलेल्या कर्जास भुपेंद्र रजनीकांत निकम हे जामीनदार आहेत. कर्जदार यांनी कर्जाची परतफेड केली नाही म्हणून जामीनदार यांच्याकडे थकीत कर्ज रकमेची मागणी केली असता त्यापोटी जामीनदार यांनी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम भुपेंद्र रजनीकांत निकम यांनी दिली नाही त्यामुळे संस्थेने भुपेंद्र रजनीकांत निकम यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राहय धरूण न्यायालयाने भुपेंद्र रजनीकांत निकम यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता अॅड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना अॅड. अमित अडागळे व अॅड. विलास ढोणे, अॅड. गौरव हरबा, अॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.


Truhome FINANCE

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; **मुख्यालय** : लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

इथे नमूद केलेले कर्जदार यांनी टुहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी होम फायनान्स लिमिटेडचे असे म्हणणे आहे की, हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहात. म्हणून या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम २००२ (सरफेसी कायदा) अन्वये आणि कलम – १३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्तावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या जाहिर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३ (२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार, सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रक्कमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदार/सहकर्जदाराचे नाव व पत्ता | सुरक्षित मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचनेनुसार दिनांक व थकबाकी रक्कम रुपयात |
|---|---|---|
| कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR ००००६३० १. श्री. रमजान अल्लाबक्ष शेख (कर्जदार) २. श्रीमती शाकीरा रमजान शेख (सह कर्जदार) सध्याचा पत्ता : सर्व्हे नं.८३२ गावठाण टाकळी, नगर, खातगाव, कल्याण रोड, अ.नगर, महाराष्ट्र, भारत ४१४ ००२ दुसरा पत्ता : स्टील्ट एफएल श्री स्वामी रेसिडेन्सी, सर्व्हे नं. २५२, भिस्तबाग, प्लॉट नं.६३, फ्लॅट नं.१०३, पाईपलाईन रोड, सावेडी रोड, अ.नगर ४१४ ००३ कर्जाची रक्कम – १८,०८,६९९ कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR ००००६३० एन.पी.ए. दिनांक ०३/०६/२०२५ | तो सर्व तुकडा आणि मालमत्तेचे पार्सल स्टिल्ट फ्लोअर फ्लॅट क्र.१०३ बिल्टअप क्षेत्रफळ ४०.६१ स्क्वे.मी. श्री स्वामी रेसिडेन्सी, प्लॉट क्र.६३ वर रितसर बांधण्यात आलेले होते. त्याचे एकूण क्षेत्रफळ ४२७.०० चौ.मी. अ.नगर महानगरपालिका अ.नगर तालुका नगर, जिल्हा अहमदनगर यांच्या हद्दीत वीट भाग येथे स्थित सर्व्हे क्र.२५/२ पूर्व – सीमा, दक्षिण – सीमा, पश्चिम – जिना, उत्तर – फ्लॅट क्रमांक १०२, २०२ | मागणी सूचना दिनांक ११–०६–२०२५ मागणी सूचना रक्कम रु. १८,८६,२१५/– (अठरा लाख शेऐंशी हजार दोनशे पंधरा रुपये फक्त) दिनांकानुसार ०९.०६.२०२५ कर्ज खाते क्र. SHLHAMDR ००००६३० आणि आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च इ. |
| कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR००००४३८ १. श्री. सुशील बाबूराव सरोदे (कर्जदार) २. श्रीमती कोमल सुशील सरोदे (सह कर्जदार) सध्याचा पत्ता : एनपीए गुंजाळे, एनपी कात्रड, चर्चच्या मागे, कात्रड, राहुरी, महाराष्ट्र, भारत ४१३ ४०४ दुसरा पत्ता : जुना सर्व्हे नं.२७९, ए २ १ सी नवीन सर्व्हे नं.२७९, ए १ सी २ युनिट नं.५ मौजे नागरदेवळे, भिंगार, अ.नगर ४१४ ००२ कर्जाची रक्कम – १८,८४,७५९ कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR ००००४३८ एन.पी.ए. दिनांक ०३/०६/२०२५ | युनिट क्र.५ क्षेत्रफळ ६३.४२ चौ.मी. तळमजला बांधकाम क्षेत्रफळ ४८.५६ चौ.मी. आणि पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र २४.८ चौ.मी. एकूण बांधकाम क्षेत्रफळ ७२.६४ चौ.मी., ४५०.०० चौ.मी., जुना सर्व्हे क्र.२७९/ए२/१सी/२ आणि नवीन सर्व्हे क्र.२७९/ए१/सी/२ या भुखंड क्षेत्रफळावर रितसर बांधण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या हद्दीत अहमदनगर तालुका आणि जिल्हा अहमदनगर नागरदेवळे पूर्व – युनिट क्र.६, दक्षिण – सर्व्हे क्र.२७९ पैकी, पश्चिम – युनिट क्र.४, उत्तर – रोड | मागणी सूचना दिनांक ११–०६–२०२५ मागणी सूचना रक्कम रु. १८,५९,५३३/– (अठरा लाख एकोणसाठ पाचशे तेहतीस रुपये फक्त) दिनांकानुसार ०९.०५.२०२५ कर्ज खाते क्र. SHLHAMDR००००४३८ आणि आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते की, ही नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम १३ (१३) नुसार सदर वर्णीत मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री, भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : अहमदनगर — सही/– अधिकृत अधिकारी
दिनांक : १६.०६.२०२५ — ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)




लिटिल फ्लॉवर नर्सिंग स्कूलचा फादर डे साजरा करत चाँदबिबी महालावर वृक्षारोपण करण्यात आले.

# लिटिल फ्लॉवर नर्सिंग स्कूलचा फादर डे साजरा करत चाँदबिबी महालावर वृक्षारोपण

नगर – लिटिल फ्लॉवर नर्सिंग स्कूलने फादर डे साजरा करत चाँदबिबी महाल परिसरात वृक्षारोपण केले. स्कूलच्या संचालिका मनिषा बोगावत आणि संचालक विशाल बोगावत यांच्या संकल्पनेतून फादर डे निमित्त निसर्गाच्या सान्निध्यात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

चाँदबिबी महालावर पायी जाताना फळझाडांच्या बिया आजूबाजूला टाकण्यात आल्या. छोटी मुले झाडांच्या बिया टाकण्याचा आनंद घेत होती. पालकांच्या हातांनी फळझाडांची रोपे पुरेसे खड्डे घेत लावण्यात आली. यामुळे बालचमूवर वृक्षारोपण करण्याचा संस्कार झाला. पालकांनी आम्ही दर आठवड्याला येथे येऊन आपण लावलेले झाड उत्तमरितीने वाढेल याची काळजी घेऊ, अशी शपथ घेतली. स्कूलतर्फे सर्वांच्या अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रहार दिव्यांग संघटनेचे लक्षवेधी आंदोलन सुरू

## बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला शेतकऱ्यांचा पाठिंबा



बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

नगर – बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अॅड. लक्ष्मण पोकळे, विनोद परदेशी, मधुकर घाडगे, लक्ष्मीताई देशमुख, हमीद शेख, संदीप शेंडकर, शिकारे सर, राजेंद्र पोकळे, सिराज शेख, बंडू लबडे, ज्ञानदेव कोळ, नितीन भन्साळी, रोहिणी करंडे, योगेश लबडे, सलीमभाई शेख, दादासाहेब शेजुळ, अशोक खेडकर, अरविंद नरसाळे, कांता सरडे, कमल सरोदे आदीसह अपंग बांधव व शेतकरी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, शेतकरी कष्टकरी कामगार दिव्यांग महिला व अन्य वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ८ जूनपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे परंतु शासनाने राष्ट्र मागण्यांबाबत अद्यापपर्यंत कुठलीही दखल न घेतल्याने प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्यावतीने पाठिंबा दर्शन लक्षवेधी आंदोलन सुरू करण्यात आले या आंदोलनाला बळ देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये प्रमुख मागण्या दिव्यांग बांधवांना सहा हजार रुपये पेन्शन मिळाली पाहिजे व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे मेंढपाल व मच्छीमार यांच्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे तसेच शेतकऱ्यांच्या पिकास हमीभाव दिले पाहिजे अशा विविध मागण्यांसाठी लक्षवेधी आंदोलन सुरू करण्यात आले आहे.


**"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६१ (१) व नियम १९६१ चे नियम १०७(३) कायद्यान्वये"**

नाशिक विभागातील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन मर्या., अहिल्यानगर द्वारा– मुख्य कार्यालय : फ्लॅट नं.०४, साक्षी चेंबर्स, कोर्ट गल्ली. अहिल्यानगर ४१४००१

जा.क्र./रिकव्हरी / एस.आर.ओ / १५६ / १११/२०२५–२६ — दिनांक:– ११/०६/२०२५

**स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस**

**नमुना 'झेड' ( नियम १०७ पोट–नियम (११ (ड–१)**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित अहमदनगर, मुख्य कार्यालय :– बागडपट्टी, ता. नगर जि. आहिल्यानगर द्वारा :– नाशिक विभागातील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन गर्या., अहिल्यानगर महाराष्ट्र सह. संस्था नियम १९६१ अन्वये असून मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीसी मध्ये नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. खाली सही करणाऱ्याने जप्तीची नोटीस दिलेली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

ऋणकोने रक्कमेचा जमा/भरणा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व नियम १९६१ चे नियम १०७ (३) कायद्यान्वये (नियम १०७ पोट नियम (११(ड – १) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. ११/०७/२०२५ दिवशी ताबा घेतला जाईल. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे कि, सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये. व तसा व्यवहार केल्यास :– **लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित अहमदनगर, मुख्य कार्यालय :– बागडपट्टी, ता. नगर जि. आहिल्यानगर** व्दारा यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज या संस्थेला आधीन राहावे लागेल.

**–: स्थावर मालमत्तेचे वर्णन:–**

| अनु क्र | थकबाकीदारांचे नावे | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट क्र. भूमापन क्र. | क्षेत्र हे . आर. चौ. मी. | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार श्री/सौ. :– जगधने प्रथमेश बाळासाहेब / बाळू मु.पो.नं.२०२, शिवम अपार्टमेंट बालिकाश्रम रोड, ता. नगर, जि.अ.नगर १) जामीनदार श्री/सौ. जगधने, बाळासाहेब/बाळू मारुती मु.पो.नं.२०२, शिवम अपार्टमेंट बालिकाश्रम रोड, ता. नगर, जि.अ.नगर २) जामीनदार श्री/सौ.:– डाडर राहुल गजानन मु.पो. ब्लॉक नं. एम. ७४, एमआयडीसी, नागापूर, ता. नगर, जि. अ.नगर | १३,००,१६६.०० | जंगम/स्थावर मागणी मालमत्ता जप्ती पूर्वीची नोटीस दि. ११/१०/२०२२ व दि. १९/१२/२०२३ जंगम जप्ती आदेश दिनांक ०७/११/२०२२ व ०६/०२/२०२४ स्थावर मालमत्ता जप्ती पूर्वीची दि. १५/०२/२०२४ व स्थावर जप्ती आदेश दि. २०/१२/२०२४ | अहिल्यानगर १ | सीटी सर्व्हे नं. ७३८४/१ :– फ्लॅट नं. २०२, शिवम अपार्टमेंट, बालिकाश्रम रोड | ७४.३२ चौ.मी. | मूळ नकाशा प्रमाणे |
| २. | कर्जदार श्री/सौ. आशुतोष भालचंद्र पारोळेकर मु.पो. घर नं. १०१, गुरुकृपा अपार्टमेंट, रविश कॉलनी, कायनेटिक चौक, नगर, ता. नगर, जि. अ.नगर १) जामीनदार श्री./सौ.:– मुनोत किशोर जवाहरलाल मु.पो. फ्लॅट नं. ४, डीएसके. हाईटस्, कायनेटिक चौक, नगर, ता. नगर, जि. अ.नगर २) जामीनदार श्री/सौ.:– मुनोत प्रशांत जवाहरलाल मु.पो. फ्लॅट नं. ४, डीएसके. हाईटस्, कायनेटिक चौक, नगर, ता. नगर, जि. अ.नगर | १३,७५,४४७.०० | जंगम/स्थावर मागणी मालमत्ता जप्ती पूर्वीची नोटीस दि. ११/१०/२०२२ व दि. ११/१२/२०२३ जंगम जप्ती आदेश दिनांक ०७/११/२०२२ स्थावर मालमत्ता जप्ती पूर्वीची दि. ०१/०२/२०२३ व स्थावर जप्ती आदेश दि. ०१/०३/२०२३ | चास :– | गट क्र. व उपविभाग ५९९ खाते क्र. ४८२२ ३३ | ०१.४१.०० | मूळ नकाशा प्रमाणे |

दिनांक :– १०/०६/२०२५
स्थळ :– अहिल्यानगर

विशेष वसुली व विक्री अधिकारी
"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६(१) व नियम १९६१ चे नियम १०७ (३) कायद्यान्वये"
द्वारा :– लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित अहमदनगर


# बंदिश संस्थेच्यावतीने २२ जून रोजी नगरमध्ये स्वरगंध मैफलीचे आयोजन

नगर – बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठान या संस्थेच्यावतीने स्वरगंध या सौ. मुग्धा भट – सामंत यांच्या शास्त्रीय आणि उपशास्त्रीय गायनाच्या मैफलीचे २२ जून रोजी सायंकाळी ६ वाजता रावसाहेब पटवर्धन सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले आहे.



सौ. मुग्धा भट – सामंत

सौ. मुग्धा भट – सामंत या मूळच्या पुण्याच्या असून, त्यांचे सध्या वास्तव्य रत्नागिरी येथे आहे. त्यांचे गायनाचे शिक्षण गायिका विदुषी वीणा सहस्रबुद्धे, विदुषी पद्मा तळवलकर, पंडीत विकास कशाळकर इत्यादींकडे झाले आहे. त्यांचे आकाशवाणी, दूरदर्शन तसेच पुणे, मुंबई, कोकण, गोवा आणि देशभरात कार्यक्रम झाले आहेत. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. शास्त्रीय गायनाबरोबर, उपशास्त्रीय, नाट्यसंगीत, अभंग गायनात त्यांचे विशेष प्राविण्य आहे. त्यांना तबल्यावर शेखर दरवडे आणि हार्मोनियमवर मकरंद खरवंडीकर हे साथसंगत करणार आहेत.

सदर कार्यक्रम विनामूल्य असून सर्व रसिक, गुरुजन आणि विद्यार्थी यांनी या मैफलीस उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्षा डॉ.धनश्री खरवंडीकर, उपाध्यक्ष अविनाश देऊळगावकर, सचिव सुमेधा देशपांडे, कोषाध्यक्ष अविनाश बोपर्डीकर, सहसचिव अनुजा कुलकर्णी आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# अर्थजगत

## खासगी विम्याला द्या विम्याचं कवच




**विम्याचे फायदे**

- ✔ कुटुंबावर अचानक आर्थिक दायित्वाचा बोजा येत नाही.
- ✔ क्रेडिट स्कोअरवर वाईट परिणाम होण्यापासून संरक्षण मिळते.
- ✔ संकटसमयी आर्थिक सुरक्षिततेचा आधार मिळतो.

• **किती रकमेचा विमा घ्यावा?**
हे पूर्णतः लोनच्या रकमेवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, जर तुम्ही ₹५ लाखांचे पर्सनल लोन घेतले असेल, तर त्याच्या ५ ते १० हफ्त्यांइतक्या रकमेचा विमा घेणे शहाणपणाचे ठरते.

**क्लेम कसा करावा?**

- ✔ संबंधित विमा कंपनीकडे त्वरित कळवा.
- ✔ मृत्यू प्रमाणपत्र, हॉस्पिटल रिपोर्ट, नोकरी गमावल्याचा पुरावा इत्यादी आवश्यक कागदपत्रे सादर करा.
- ✔ सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर विमा कंपनी तुमच्या कर्जदात्या संस्थेला थेट रक्कम ट्रान्सफर करते.
- ✔ सर्व कंपन्यांच्या पॉलिसींच्या अटी वेगवेगळ्या असतात. त्यामुळे कोणतीही इन्शुरन्स पॉलिसी घेण्यापूर्वी तिचे नियम वाचून समजून घ्या.

पर्सनल लोन हा एक अनसिक्योर्ड कर्ज प्रकार असतो. म्हणजेच यामध्ये बँक कोणतीही मालमत्ता गहाण घेत नाही. त्यामुळे या कर्जावर व्याजदर तुलनेने जास्त असतो. तसेच या कर्जाच्या वसुलीचे नियमही काहीसे कडक असतात. अशा वेळी जर एखादी आपत्ती ओढावली तर मोठी अडचण निर्माण होऊ शकते. यावर उपाय म्हणजे या कर्जाचा विमा उतरवणे.

पर्सनल लोन प्रोटेक्शन इन्शुरन्स ही विमा पॉलिसी आपत्कालीन परिस्थितीत आर्थिक संरक्षण प्रदान करते. एखाद्या कारणामुळे तुम्हाला पुढे कर्जाचा ईएमआय भरता आली नाही, तर हा विमा तुमच्यासाठी उपयुक्त ठरतो. नोकरी जाणे, अपघात किंवा आजारामुळे अपंगत्व येणे, कर्ज घेणाऱ्याचा मृत्यू होणे अशा परिस्थितीत हा विमा उपयुक्त ठरतो. या विम्यासाठी तुम्ही एकरकमी प्रीमियम भरू शकता किंवा प्रीमियम रक्कम लोनच्या ईएमआयमध्ये समाविष्ट करू शकता.

**■ माहीत हवे**

प्रीमियमची रक्कम कर्जदाराचे वय, आरोग्य स्थिती, सेवा कालावधी आणि लोनच्या रकमेवर आधारित असते.कर्जदार अपघातामुळे किंवा गंभीर आजारामुळे काम करू शकत नसल्यास, विमा कंपनी ठराविक कालावधीसाठी मासिक हफ्ते भरण्यासाठी जबाबदार असते.

काही कारणामुळे नोकरी गमवावी लागली तर विशिष्ट काळासाठी विमा कंपनी ईएमआय भरते.जर लोनधारकाचा मृत्यू झाला, तर त्याचे उर्वरित कर्ज विमा कंपनी भरते. त्यामुळे कुटुंबावर आर्थिक बोजा येत नाही.

## युद्धामुळे बाजारात घसरण एसआयपीचे काय करावे?




आजच्या काळात एसआयपी म्हणजेच सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन ही सर्वसामान्य लोकांसाठी दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची एक प्रभावी आणि शिस्तबद्ध पद्धत ठरली आहे. दर महिन्याला थोडीथोडकी रक्कम गुंतवून काही वर्षांनंतर कोट्यधीश होण्याची शक्यता यामध्ये असते. मात्र, जीवनात काही वेळा अशी स्थिती उद्भवते त्या परिस्थितीत उलटसुलट निर्णय घेतले जातात. नोकरी जाणे, एखादी वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवणे किंवा बाजारातील मोठी घसरण यामुळे लोक घाबरुन आपली एसआयपी थांबवतात. हा निर्णय अनेकदा घाईघाईत घेतला जातो आणि त्यानंतर पश्चात्ताप करण्याची वेळ येते.

गेल्या काही दिवसांपासून नवनवीन उच्चांक गाठणाऱ्या भारतीय शेअर बाजारात अहमदाबाद विमान अपघात आणि इराण–इस्राईल यांच्यातील संघर्षामुळे जोरदार घसरण झाली. आखातातील अशांतता दीर्घकाळ राहते असा आजवरचा अनुभव आहे. मग अशा स्थितीत एसआयपीचे काय करावे असा प्रश्न अनेकांना पडला आहे. याबाबतचा निर्णय घेताना काही गोष्टी लक्षात घ्या

सामान्यतः शेअर बाजार घसरतो, तेव्हा अनेकांना वाटते की आपले पैसे बुडत आहेत. त्यादृष्टिकोनातून ते गुंतवणूक थांबवण्याचा निर्णय घेतात. पण खरेतर हाच काळ एसआयपीसाठी सर्वात फायदेशीर असतो. कारण जेव्हा बाजार घसरतो, तेव्हा तुम्हाला त्या रकमेवर अधिक युनिट्स मिळतात. याला सवलतीतील खरेदी म्हणता येईल. मान्सून सेलमध्ये ज्याप्रमाणे एखादी वस्तू स्वस्तात मिळत असेल, तर आपण जास्त खरेदी करतो, तशाच प्रकारे बाजारातील घसरण ही धोक्याची घंटा नसून युनिट्स् खरेदीची संधी असते.

आल्बर्ट आइन्स्टाईन यांनी चक्रवाढ व्याजाला जगातील आठवे आश्चर्य म्हटले होते. चक्रवाढ व्याज म्हणजे व्याजावर व्याज. गुंतवणूक जितका काळ टिकते, तितके तुमचे पैसे झपाट्याने वाढतात. सुरुवातीला याचा फारसा फरक जाणवत नाही, पण १०–१५ वर्षांनंतर त्याचा प्रभाव प्रचंड असतो. याउलट एसआयपी थांबवली, तर ही व्याजावर व्याज मिळण्याची साखळी तुटते. त्यामुळे तुमच्या पैशांना वाढण्याची संधी मिळत नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे, एसआयपी सुरु करताना प्रत्येकाने निश्चितच एखादे उद्दिष्ट ठेवलेले असते. मुलांचे शिक्षण, सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचे नियोजन, घर किंवा गाडी खरेदी इत्यादी. पण मधेच गुंतवणूक थांबवल्यास हे उद्दिष्ट दूर जाऊ शकते. म्हणूनच तात्पुरत्या अडचणींच्या आधारावर दीर्घकालीन उद्दिष्टांशी तडजोड करू नका. आर्थिक शिस्त राखा आणि ध्येयावर ठाम रहा.

**■ माहीत हवे**

**रुपी कॉस्ट ॲव्हरेजिंगचा लाभ गमावणे**

एसआयपीचा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा म्हणजे दर महिन्याला बाजाराच्या स्थितीनुसार गुंतवणूक होत राहते. बाजार वर असेल तेव्हाही आणि घसरला असेल तेव्हाही. बाजार महाग असताना कमी युनिट्स मिळतात, स्वस्त असताना जास्त. त्यामुळे कालांतराने युनिट्सच्या खरेदीची सरासरी किंमत कमी होते आणि नफा वाढण्याची शक्यता अधिक असते. एसआयपी थांबवल्यास या नैसर्गिक संधीचा फायदा गमावला जातो.

जर खरोखरच आर्थिक अडचण असेल आणि दर महिन्याची रक्कम भरताना अडचण येत असेल, तर एसआयपी पूर्णपणे थांबवण्याऐवजी ती पॉझ करण्याचा निर्णय घेऊ शकता. बऱ्याच गुंतवणूक योजनांमध्ये १ ते ६ महिन्यांपर्यंत एसआयपी थांबवण्याची सुविधा असते. तसेच, तुम्ही तुमची मासिक गुंतवणूक कमीही करू शकता. उदाहरणार्थ, जर ५००० रुपयांची एसआयपी अडचणीत आली असेल, तर ती दोन किंवा तीन हजारांपर्यंत कमी करूनही तुम्ही गुंतवणूक सुरू ठेवू शकता. काही प्रमाणात गुंतवणूक तरी सुरू ठेवणे ह्र हे काहीच न करण्यापेक्षा नेहमीच चांगले! ◆◆◆

## एटीएममधून काढा फंडातील निधी

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, म्हणजेच ईपीएफओ. ही अशी संस्था आहे जी नोकरदार लोकांसाठी पीएफ खाती उघडते, ज्यामध्ये त्यांच्या पगाराचा काही भाग दरमहा जमा केला जातो. आता हे ईपीएफओ त्यांच्या कोट्यवधी सदस्यांसाठी आनंदाची बातमी घेऊन येत आहे. लवकरच तुम्ही तुमचे पीएफ पैसे एटीएममधून काढू शकाल, तेही कोणत्याही अडचणीशिवाय.

ईपीएफओ या महिन्यात, म्हणजेच जून २०२५ मध्ये त्यांचे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म ईपीएफओ ३.० लाँच करणार आहे. या नवीन प्रणालीअंतर्गत, पीएफ खातेधारकांना अनेक आश्चर्यकारक सुविधा मिळतील, त्यापैकी सर्वात मोठी सुविधा म्हणजे एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा. ईपीएफओ सदस्यांना त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे पैसे सहजपणे काढण्यासाठी विशेष एटीएम कार्ड देणार आहेत.

ईपीएफओ ३.० ही कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेची अपग्रेडेड आवृत्ती आहे, जी पूर्णपणे डिजिटल आणि वापरकर्ता–अनुकूल असणार आहे. आतापर्यंत पीएफचे पैसे काढण्यासाठी तुम्हाला बरीच कागदपत्रे भरावी लागत होती. फॉर्म भरणे, कागदपत्रे सादर करणे आणि नंतर पैसे खात्यात जमा होतील की नाही हे पाहण्यासाठी आठवडे वाट पाहणे. पण हा सर्व ताण संपणार आहे.या नवीन प्लॅटफॉर्मचा उद्देश पीएफशी संबंधित प्रत्येक प्रक्रिया इतकी सोपी करणे आहे की तुम्ही घरी बसून किंवा एटीएममध्ये जाऊन तुमचे पैसे काढू शकाल. ही प्रणाली एका उच्च–तंत्रज्ञानाच्या आयटी प्लॅटफॉर्मवर आधारित आहे, जी केवळ जलदच नाही तर पारदर्शक देखील आहे. म्हणजेच, तुम्हाला प्रत्येक पायरीबद्दल माहिती मिळेल आणि कोणतीही चूक होण्याची शक्यता कमी असेल. यासाठी, तुमचा युनिव्हर्सल अकाउंट नंबर सक्रिय असणे आवश्यक आहे. त्याचे. तसेच, तुमचे बँक खाते आणि आधार यांच्यात दुवा असणे खूप महत्वाचे आहे. यासाठी शेवटची तारीख ३० जून निश्चित करण्यात आली आहे. ◆◆◆

## युद्धझळांचे सावट




गतसप्ताहामध्ये भारतीय शेअर बाजारात जोरदार घुसळण पाहायला मिळाली. देशांतर्गत पातळीवर किरकोळ महागाई ७ ५ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचल्यामुळे बाजाराला दिलासा मिळाला होता. अमेरिका–चीन व्यापार वाटाघाटींमध्ये प्रगती झाल्यामुळे सुरुवातीला काहीशी आशा निर्माण झाली होती. मात्र इस्रायलने इराणच्या अणु केंद्रांवर हल्ला केल्याने भूराजकीय तणाव वाढला आणि बाजारातील उत्साह मावळला. या घटनेमुळे गुंतवणूकदारांनी जोखीम पत्करण्याला लगाम घालत तात्काळ नफावसुली सुरू केली. परिणामी, बाजारात जोरदार घसरण दिसून आली. गुरुवारी अहमदाबाद विमान अपघाताच्या दिवशीही बाजारात घसरण झाली होती.

इस्राइल आणि इराणमधील युद्ध दीर्घकाळ चालण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे बाजाराचे वातावरण पूर्णपणे बदलून गेले. परंपरेप्रमाणे अशा काळात शेअर बाजारात घसरण होतच असते आणि गुंतवणूकदार सोने आणि अमेरिकन बाँड यांसारख्या सुरक्षित गुंतवणूक पर्यायांकडे वळतात. त्यामुळे मागील काही दिवसांपासून घसरणीचा कौल दर्शवणाऱ्या सोन्याला या युद्धाने पुन्हा झळाळी लाभली. दुसरीकडे बदलत्या परिस्थितीमुळे शुक्रवारी डॉलर निर्देशांक ०.२२ टक्क्यांनी वाढून ९८.१४ या पातळीवर पोहोचला. वास्तविक, युद्धाच्या एक दिवस आधी डॉलर निर्देशांक तीन वर्षांच्या नीचांकी पातळीवर होता.

शुक्रवारची घसरण एकीकडे घबराट पसरवणारी असली तरी हेही दुर्लक्षून चालणार नाही की, गेल्या आठवड्यामध्ये पूर्वार्धात बाजारात दमदार तेजी दिसून आली. विशेषतः बँकिंग क्षेत्रातील समभागांच्या खरेदीला आलेला जोर बँक निफ्टीला नव्या शिखरावर घेऊन गेला. ५७०४९ ही नवी सार्वकालिक उच्चांकी पातळी बँक निफ्टीने गाठली होती. पण सप्ताहाखेरीस हा निर्देशांक ५५५२७ या पातळीवर बंद झाला.

निफ्टीनेही २५२२२ ही पातळी गाठल्यानंतर २४७१८ वर विसावा घेतला. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये साप्ताहिक आधारावर घसरणीची टक्केवारी ०.५० टक्के इतकीच आहे.कमजोर विदेशी संकेतांमुळे प्रमुख निर्देशांक १ टक्क्यांहून अधिक तोट्याने बंद झाले असले तरी तर व्यापक बाजारात संकेत मिश्रीत राहिले. लार्ज कॅप निर्देशांकामध्ये सुमारे १ टक्क्यांची घसरण झाली असली तरी स्मॉल कॅप निर्देशांक स्थिर राहिला. काही लहान शेअर्सनी चांगली कामगिरी केली असून काही समभागात आठवड्याच्या कालावधीत ४० हून अधिक शेअर्समध्ये १० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे; तर २० टक्क्यांहून अधिक वाढ पाहायला मिळाली. याउलट पाच समभागांमध्ये १० टक्क्यांहून अधिक घसरण झाली. क्षेत्रीय निर्देशांकाचा विचार केल्यास निफ्टी रिअल्टीमध्ये ३ टक्क्यांची घसरण झाली; तर रुपयाने झालेल्या घसरणीमुळे निफ्टी आयटी निर्देशांकात ३ टक्क्यांची वाढ झाली. ऑटो, रिअल्टी आणि बँकिंगसारख्या व्याजदरांशी संवेदनशील क्षेत्रांमध्ये नफा वसुली झाली.

**■ मार्केट वॉच**

या युद्धामुळे बाजारात घबराटीचे वातावरण पसरले आहे. याची प्रमुख कारणे तीन. एक म्हणजे डॉलरमध्ये दिसून आलेली वाढ. हल्ल्याच्या बातम्यांमुळे कमकुवत झालेल्या डॉलरला सावरण्याची संधी मिळाली आहे. बदलत्या परिस्थितीमुळे डॉलरला पुन्हा एकदा सेफ हेवन म्हणजे सुरक्षित मालमत्ता म्हणून पाहिले जात आहे. याचा विदेशी गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम होतो. दुसरे म्हणजे जागतिक पुरवठा साखळी विस्कळित होऊन पुन्हा महागाईचा भडका उडण्याची आणि निर्यातीला फटका बसण्याची शक्यता आणि तिसरे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे कच्च्या तेलाच्या दरात आलेली त्सुनामी. इस्राईलने केलेल्या हल्ल्याचे वृत्त आले आणि शुक्रवारी सकाळी कच्च्या तेलाचे भाव अक्षरशः रॉकेटसारखे उडाले. एमसीएक्सवर क्रूड ऑईलचे भाव गुरुवारी ५८०० च्या आसपास होते; ते शुक्रवारी ६४७५ वर पोहोचले. सतत दबावाला सामोरे जात असलेल्या डॉलर व क्रूडने दिशा बदलली आहे. ब्रेंट क्रूड ७ टक्क्यांनी वाढून ७४.२१ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहे. इराण–इस्राईल संघर्ष असाच सुरु राहिला तर कच्चे तेल १५० बॅरलपर्यंत झेपावू शकते. तसे झाल्यास भारतासाठी ती प्रचंड अडचणीची बाब ठरेल.

गेल्या आठवड्यातही परदेशी गुंतवणूकदारांकडून विक्रीचा कल कायम राहिला. हा सलग चौथा आठवडा होता जेव्हा परदेशी गुंतवणूकदारांनी निव्वळ विक्री केली. आठवड्यादरम्यान एफआयआयनी १२४६ कोटी रुपयांची विक्री केली; याउलट डीआयआयनी १८,६३७ कोटी रुपयांची खरेदी केली आहे.

टेक्निकल चार्ट पाहिल्यास पुन्हा एकदा निफ्टीला २५,२०० च्या पातळीवर आणि ८२,८०० च्या आसपास प्रतिकाराचा सामना करावा लागल्याचे दिसते. म्हणजेच या पातळीवर पोहोचल्यानंतर दोन्ही निर्देशांकांची दिशा बदलली. निफ्टीच्या वीकली चार्टवर बियरिश कँडल बनली आहे. जोपर्यंत निफ्टी २४,८५० च्या खाली राहील तोपर्यंत घसरण कायम राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पुन्हा २४,५००च्या पातळीपर्यंत घसरण होऊ शकते. जर हा स्तरही तुटला, तर विक्रीचा दबाव वाढू शकतो आणि २४,३००पर्यंतची घसरणही दिसू शकते. वरच्या बाजूचा विचार करता २४,७५० ला अडथळा पातळी आहे. ती ओलांडून बाजार स्थिरावल्यास २४,९५० ते २५ हजारांपर्यंत झेपावू शकतो. बँक निफ्टीसाठी ५५,००० ते ५५,२०० दरम्यान महत्त्वाचा आधार आहे. तो टिकून राहिल्यास हा निर्देशांक पुन्हा ५६,१००–५६,३०० च्या दिशेने झेपावण्याची शक्यता आहे.

मागील काही दिवसांपासून आलेल्या तेजीमुळे अनेक समभागांचे मूल्यांकन वधारलेले आहे. जागतिक भूराजकीय तणावामुळे गुंतवणूकदार सावध भूमिका घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे चालू आठवड्यात सेल ऑन राईज ही रणनीती उपयुक्त ठरू शकते.

समभागांचा विचार करता सद्यस्थितीत संरक्षण क्षेत्रातील समभागांमध्ये दमदार खरेदी झाली आहे. आगामी तणावाचा काळ पाहता जागतिक ऑर्डर्सच्या पार्श्वभूमीवर डिफेन्स क्षेत्रातील समभागांमध्य नवी तेजी दिसू शकते. जगभरात पुन्हा संरक्षण खर्च वाढण्याची शक्यताही यास आधार असेल. पण कमजोर जागतिक संकेतांमुळे बाजारात मंदी राहण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांची 'रेसिप्रोकल टॅरिफ' लागू करण्याची वेळमर्यादा जवळ येत चालली आहे. ट्रम्प यांचे म्हणणे आहे की ही मर्यादा वाढवणे आवश्यक ठरणार नाही. उल्लेखनीय बाब म्हणजे, ट्रम्प यांनी व्यापार करारासाठी नव्या शुल्कांवर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. ही मुदत ९ जुलै रोजी संपुष्टात येणार आहे. याबाबतच्या घडामोडीही बाजारावर प्रभाव टाकतील.

समभागांच्या पातळीवर विचार करता फार्मा क्षेत्रातील सनफार्मा, ग्लेनमार्क, दिवीज लॅब आणि बायोकॉन या समभागांमध्ये येत्या काही दिवसांत चांगला परतावा मिळण्याची शक्यता आहे; तर बीईएल आणि एचएएल या डिफेन्स इंडस्ट्रीमधील समभागांतही मोठी तेजी दिसू शकते.

बाजाराचे प्रमुख लक्ष मध्यपूर्वेतील परिस्थितीकडे असेल. सद्यस्थितीत हा तणाव इतक्या लवकर शमण्याची शक्यता नसल्याने गुंतवणूकदारांनी अत्यंत सावध राहणे गरजेचे आहे. ◆◆◆

## वित्तीय नियोजनाची सप्तपदी

समाजमाध्यमांवर सध्या चार्टर्ड अकाउंटंट नितीन कौशिक यांचे एक ट्विट चांगलेच व्हायरल होत आहे. त्यांची ७ साधी पण प्रभावी आर्थिक सवयींची यादी अनेकांना आर्थिकदृष्ट्या सशक्त आणि मानसिकदृष्ट्या शांत बनवू शकते. यासाठी ना कोट्यवधींची गरज आहे, ना गुंतागुंतीच्या योजना. फक्त थोडेसे नियोजन, शिस्त आणि सातत्य आवश्यक आहे.




**■ दोन महिन्यांचे वेतन साठवा**

सुरुवातीला आपल्या दोन महिन्यांच्या पगाराइतकी रक्कम बाजूला ठेवा. यामुळे महिन्याच्या अखेरीस खर्चासाठी त्रास होणार नाही आणि अचानक खर्च उद्भवल्यास तो सहज हाताळता येईल.

**■ आपत्कालीन निधी तयार ठेवा**

कोणतीही नोकरी शाश्वत नसते आणि आरोग्यविषयक आपत्ती कधीही येऊ शकते. म्हणून, किमान तीन ते सहा महिन्यांच्या खर्चाइतका फंड कायम तयार ठेवा.

**■ थोडी मौजमजा आवश्यकच आहे**

बचत म्हणजे सर्व मजा टाळणे नव्हे. आपल्या उत्पन्नाचा ५ ते ७ टक्के भाग मौजमजेसाठी किंवा चैनीसाठी राखून ठेवा. मग ते नवे बूट असोत वा एखादी छोटी सहल. नितीन म्हणतात, बूट घ्या; पण मर्यादेत. कारण आयुष्य लहान आहे!

**■ निवृत्तीनिधीची तयारी**

आपण २५ वर्षांचे असाल किंवा पस्तिशीतले; आजपासूनच दरमहा ५ ते १० टक्के रक्कम निवृत्तीसाठी बाजूला काढायला सुरुवात करा. सुरुवात जितक्या लवकर कराल तितका कंपाऊंड इंटरेस्टचा फायदा अधिक मिळेल.

**■ वित्तीय नियोजन**

**■ उत्पन्नाचे दुसरे मार्ग शोधा**

फक्त नोकरीवर अवलंबून राहू नका. काहीतरी असे ठरवा, ज्यातून सतत उत्पन्न येईल. उदाहरणार्थ, घर भाड्याने देणे, डिजिटल उत्पादने विकणे किंवा एखादा लघु व्यवसाय सुरु करणे.

**■ नियमित गुंतवणूक करा**

प्रत्येक महिन्याच्या उत्पन्नाचा किमान ५ ते १० टक्के भाग शेअर बाजार, एस.आय.पी. किंवा सोन्यात गुंतवा. ही सवय हळूहळू तुमची संपत्ती वाढवेल.

**■ कर्जमुक्तीसाठी 'डेट स्नोबॉल'**

जर ७ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज असलेले कर्ज असेल, तर ते सर्वप्रथम फेडा. सर्वात लहान कर्जे आधी फेडा, त्यामुळे आत्मविश्वास वाढेल आणि कर्जाचा भार हळूहळू कमी होईल. ◆◆◆

## 'ईएमएफ' मध्ये गुंतवणूक करताना....

**■ म्युच्युअल फंड**

गेल्या काही वर्षांत गुंतवणूकदारांचा कल हा थेट शेअर खरेदी करण्याऐवजी इक्विटी म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीकडे वाढला आहे. हा एक चांगला ट्रेंड आहे. अन्य गुंतवणूक योजनांच्या तुलनेत इक्विटी म्युच्युअल फंडने चांगला परतावा दिला आहे. परंतु कालावधी हा तितकाच महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करताना आणि गुंतवणूक कायम ठेवताना चूका टाळल्या पाहिजेत.




**आर्थिक ध्येयाशिवाय गुंतवणूक**

गुंतवणूक करताना आर्थिक ध्येय असणे आवश्यक आहे. तुमचे लक्ष्य मोटार खरेदी करणे, घर खरेदी करणे, मुलांचे शिक्षण, विवाह, निवृत्ती आदी असू शकतात. यापैकी कोणतेच लक्ष्य नसेल तर गुंतवणूक ही केवळ धनवृद्धीसाठी राहू शकते. ध्येय गाठण्याचा कालावधी आणि त्यातील बदलाच्या आधारावर गुंतवणुकीची योजना निवडली पाहिजे. परदेशातील प्रवास किंवा घर खरेदीचे ध्येय पुढे ढकलता येऊ शकते. मात्र मुलांचे शिक्षण अणि विवाह टाळता येऊ शकत नाही. त्यामुळे ध्येयाच्या जवळ आल्यानंतर चढ उतारापासून वाचण्यासाठी इक्विटीतील रक्कम ही डेट फंडमध्ये स्थानांतरित करणे आवश्यक आहे.

**लाभांशाचा पर्याय**

म्युच्युअल फंडमधून मिळणारा लाभांश हा फंडच्या नेट ॲसेट व्हॅल्यूतूनच मिळत असतो. म्हणजे तुमच्याच पैशातून लाभांश दिला जातो. लाभांशानंतर एनएव्ही हा आपोआप कमी होतो. म्युच्युअल फंडच्या लाभांशावरची कर आकारणी स्लॅबनुसार होते. दीर्घकालीन कालावधीच्या गुंतवणूकीवर भांडवली लाभ कर १२.५० टक्के आकारला जातो. म्हणूनच लाभांश योजना ऐवजी ग्रोथचा पर्याय निवडावा. गरज भासल्यास सिस्टेमॅटिक विड्रॉल प्लॅनमधून पैसे काढावेत.

**कमी काळात परताव्याची अपेक्षा**

इक्विटी म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळू शकतो. मात्र हा परतावा दरवर्षी सारखाच मिळतो असे नाही. यासाठी मुदत ठेव योजना आहे. परंतु इक्विटीतील गुंतवणुकीत सतत चढउतार होत असतो. तुमच्या गुंतवणुकीचा कार्यकाळ हा सात वर्षापेक्षा कमी असेल तर भांडवल कमी राहण्याचा धोका असतो. त्यामुळे इक्विटीसाठी अधिकाधिक कालावधीचा विचार करणे आवश्यक आहे. तुमच्याकडे एवढा वेळ नसेल तर मुदत ठेवीसारख्या योजनांचा विचार करावा. दीर्घकाळातील गुंतवणुकीने इक्विटीचा प्रवास स्थिर राहतो आणि बाजारातील चढ उताराचा कालांतराने त्यावर परिणाम होत नाही. इक्विटी म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक दहा पंधरा वर्षापेक्षा अधिक काळासाठी असावी. तसेच दरवर्षी चांगल्या परताव्याची अपेक्षा ठेऊ नये हे देखील तितकेच खरे.

**गुंतवणुकीचा आढावा**

गुंतवणुकीचा वेळोवेळी आढावा घेतला पाहिजे. ध्येयानुसार केली जाणारी गुंतवणूक ही अपेक्षेप्रमाणे कामगिरी करत आहे की नाही ते पाहणे महत्त्वाचे आहे. बऱ्याच काळापासून नकारात्मक परतावा असेल किंवा कमी मिळत असेल तर अशावेळी दुसऱ्या योजनेत स्थानांतरित व्हा किंवा गुंतवणुक वाढवा. त्याचवेळी गरजेपेक्षा जास्त आढावा घेणे देखील नुकसानकारक आहे. दर महिन्यांच्या कामगिरीवरुन निर्णय घेऊ नका. दरवर्षी एकदाच आढावा घ्या.

**वैविध्यकरणांचा अभाव**

काही गुंतवणूकदार एकसारख्या गुंतवणूक योजनेत गुंतवणूक करतात आणि त्यामुळे वैविध्यकरणाचा लाभ कमी राहतो. मात्र आपल्या पोर्टफोलिओत पाचपेक्षा कमी योजना असू नयेत. तसेच एक किंवा दोनच योजनांत गुंतवणूक करण्याचे टाळावे. आपल्या ध्येयाच्या आधारे लार्ज कॅप, मिड कॅप, स्मॉल कॅप, टॅक्स सेव्हिंग, हायब्रीड यासारख्या योजनांतून गुंतवणूक करावी. तसेच एसआयपीला टॉप अप करणे देखील फायद्याचे राहते. दरवर्षी दहा टक्के दराने गुंतवणुकीची रक्कम वाढवत राहावी.

**■ अवास्तव परताव्याची अपेक्षा**

अनेक जण इक्विटी बाजारातून अवास्तव परताव्याची अपेक्षा करतात. परंतु दीर्घकाळात म्युच्युअल फंड महागाई दराच्या साडे सहा टक्क्यांपेक्षा अधिक दर देतात आणि हा दर अन्य गुंतवणूक योजनेपेक्षा चांगला राहतो. काही जण चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंडच्या नावाखाली फसव्या योजनेत पैसे जमा करायला सांगतात. अशावेळी पैसे बुडण्याची शक्यता अधिक राहते. शेअर बाजारातून गॅरेंटेड परतावा कधीच मिळत नाही. मात्र ही मंडळी हमखास परताव्याचा दावा करत लोकांची फसवणूक करत असतात.

**■ एनएव्हीच्या आधारावर गुंतवणूक**

काही जण इक्विटी योजनाला शेअर बाजाराप्रमाणे समजतात आणि कमी एनएव्ही असणाऱ्या योजनांची निवड करतात. मात्र एनएव्हीचे मूल्य हे योजनेतील स्टॉक्सचे मूल्य सांगतात. त्यामुळे न्यू फंड ऑफर (एनएफओ) दहा रुपयांचा आहे, म्हणून त्याची खरेदी करणे जोखमीचे राहू शकते.

**■ घसरणीमुळे पॅनिक होणे**

बाजारात घसरत असताना पॅनिक होऊन काही जण एसआयपी थांबवतात किंवा पैसे काढून घेतात. त्यामुळे बाजाराच्या घसरणीच्या लाभापासून गुंतवणूकदार वंचित राहतो. या काळात गुंतवणूक कायम ठेवावी अणि जादा पैसे असतील तर अधिक गुंतवणुकीचा विचार करावा. ◆◆◆

# खा.निलेश लंकेंच्या गावाजवळ कारमध्ये आढळली घातक शस्त्रे

## तिघांवर गुन्हा दाखल, कारसह ६ लाख १ हजाराचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

नगर – नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांच्या हंगा (ता.पारनेर) गावच्या शिवारात धारदार हत्यारे असलेली कार सुपा पोलिसांनी जप्त केली आहे. पोलिसांची चाहूल लागताच धारदार शस्त्र असलेली कार सोडून आरोपी पसार झाले असल्याने एकच खळबळ उडाली आहे.


खा. निलेश लंके यांच्या हंगा गावाजवळ कार मध्ये घातक शस्त्रे आढळली असून या कारची पाहणी करताना पोलिस.

पारनेर–सुपा रोडवरील हंगा गावच्या शिवारात हॉटेल साई रेसिडेन्सी येथे १४ जून रोजी सायंकाळी ७ वाजता मारुती सियाज कंपनीच्या कारमधून (क्र.एम एच १२ क्यू टी ७४४०) अवैध शस्त्रे घेऊन जात असल्याची माहिती सुपा पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस घटनास्थळी पोहोचायच्या आत आरोपी अवैध शस्त्र असलेली कार सोडून पसार झाले आहे.

या कारमध्ये पोलिसांना लोखंडी कटावण्या, लोखंडी कोयते, मोबाईल, स्टीलचे दांडके, बेस बॉलचे दांडके असे अवैध शस्त्रे मिळून आली आहे. दरम्यान, या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात पो.कॉ. विकास गायकवाड यांच्या फिर्यादीवरून अमोल कर्डिले, सुनील बडे, अर्जुन बडे यांच्याविरोधात भारतीय हत्यार अधिनियम ४/२५, बीएनएस कलम ३ (५), महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान या प्रकरणातील मुख्य सूत्रधार अमोल कर्डिले याच्याविरोधात पारनेर व सुपे पोलिस ठाण्यात १५ पेक्षाही अधिक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

या प्रकरणाचा आधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार एस. एम. खैरे हे करत आहेत.

## अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने केले अपहरण

नगर – नगर तालुक्यातील घोसपुरी शिवारातील घोडके वाडी परिसरातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केले आले. १३ जून रोजी रात्री ११ वाजेपासून ते १४ जून रोजी पहाटे ५ वाजेपर्यंतच्या दरम्यान राहत्या घरातून पीडित मुलीला पळवून नेले असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी पीडितेच्या वडिलांनी १४ जून रोजी सायंकाळी नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी शुक्रवारी रात्री ११ वाजता त्यांच्या राहत्या घरी होती. त्यानंतर तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. सदरचा प्रकार शनिवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास लक्षात आला. फिर्यादी यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला मात्र, ती मिळून आली नाही. त्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली. पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.

# दारुच्या नशेत बस चालवणाऱ्या चालक, वाहकावर गुन्हा दाखल

**प्रवाशांनी टोल फ्री क्रमांकावर केली होती तक्रार**

नगर – एस. टी. महामंडळाच्या अहिल्यानगर ते भिंवडी या बसवरील चालक आणि वाहक यांनी ड्युटीवर असताना मद्यप्राशन केले आणि प्रवासी भरलेल्या बससह मार्गस्थ झाले. ही गंभीर बाब प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी नेप्ती (ता. अहिल्यानगर) शिवारात बस थांबवून ऑनलाईन टोल फ्री क्रमांकावर तक्रार केली. त्यानंतर हा प्रकार चव्हाट्यावर आला.

या प्रकरणी तारकपुर आगारातील वाहतूक नियंत्रक भिमराज रामभाऊ ढगे (वय ५२, रा. वाळकी, ता. नगर) यांनी १४ जून रोजी रात्री दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक किरण गोविंद केकान व वाहक सोमेश्वर जगन्नाथ रोडे यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १२ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली. ढगे यांच्या फिर्यादीनुसार, त्यांनी १२ जून रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास तारकपूर स्थानकावरून भिंवडीकडे रवाना झालेल्या एमएच–२० बीएल–३१३८ क्रमांकाच्या बसची नोंद घेतली होती. संबंधित बसवर चालक किरण केकान आणि वाहक सोमेश्वर रोडे हे नेमण्यात आले होते.

मात्र, रात्री १०.१५ वाजताच्या दरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कळविण्यात आले की, टोल फ्री क्रमांकावर प्रवाशांनी फोन करून तक्रार केली आहे की संबंधित बसचे चालक व वाहक हे दारूच्या नशेत आहेत आणि प्रवाशांनी नेप्ती गावाजवळ बस थांबवून ठेवली आहे. ढगे यांनी वर्कशॉपचे कर्मचारी सय्यद मुज्जमीन यांना घेऊन नेप्ती गावाजवळ धाव घेतली असता, बस रस्त्याच्या कडेला थांबवलेली दिसून आली आणि चालक व वाहक हे दारूच्या नशेत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर प्रवाशांना दुसर्या बसमधून पुढील प्रवासासाठी व्यवस्था करण्यात आली.

पुढे या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी ढगे यांनी दोघांची वैद्यकीय तपासणी केली. तपासणी अहवालात चालक व वाहक यांनी दारूचे सेवन केल्याचे स्पष्ट करण्यात आल्याने त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विळद शिवारात मेंढपाळाचे पालावर दरोडा टाकणारी टोळी पकडली

## २ दरोड्याचे गुन्हे उघडकीस, आरोपींकडून ३ लाखांचा मुद्देमाल केला जप्त

नगर – नगर तालुक्यातील विळद शिवारात रात्रीच्या वेळी मेंढपाळाचे पालावर दरोडा टाकून चौघांना मारहाण करत रोकड व दागिन्यांची चोरी करणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. या टोळीकडून दरोड्याचे २ गुन्हे उघडकीस आले असून त्यातील ३ लाख ४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.


विळद शिवारात मेंढपाळाचे पालावर दरोडा टाकणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

मेंढपाळ असलेले फिर्यादी पोपट बन्सी होडगर (वय ३५, रा.पिंप्री घुमट, ता.नगर) हे ९ जून रोजी मेंढया चारुन रात्री शेतामध्ये कुटुंबियासह झोपले असताना अज्ञात ६ ते ७ दरोडेखोरांनी त्यांना लाकडी दांडक्याने मारहाण करुन, चाकुचा धाक दाखवून त्यांचे पत्नीचे दागीने व रोख रक्कम जबरीने चोरुन नेली होती. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात दरोडयाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी पोलिस उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, बिरप्पा करमल, गणेश धोत्रे, अरूण गांगुर्डे, भगवान धुळे, गणेश लोंढे, शाहीद शेख, फुरकान शेख, बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, रविंद्र घुंगासे, आकाश काळे, भगवान थोरात, भाऊसाहेब काळे, सुनील मालणकर, रमीजराजा आत्तार, अमोल कोतकर, अमृत आढाव, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, चंद्रकांत कुसळकर व अरूण मोरे यांचे पथक नेमून या गुन्ह्याचा समांतर तपास सुरु केला.

सदर पथक १५ जून रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना सदरचा गुन्हा किसन उर्फ विजय गौतम काळे (रा. पानसवाडी, ता.नेवासा) याने त्याचे साथीदारासोबत केला असून ते चोरीचे सोने विक्री करण्यासाठी मोटार सायकलवरून नेवासा येथून नगर येथे पांढरीपुल मार्गे येणार असल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच पथकाने सापळा रचुन संशयीत आरोप भैय्या कडु काळे (वय १८, रा.शिरोडी, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर), ताराचंद विरूपन भोसले (वय ३५), नागेश विरूपन भोसले (वय २०, दोघे रा.गाजगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर), किसन उर्फ विजय गौतम काळे (वय २३, रा.पानसवाडी, ता.नेवासा), सोनुल लक्षरी भोसले (वय १९, रा.बिडकीन, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) यांना ताब्यात घेतले.

त्यांच्याकडे गुन्हयाबाबत कसून चौकशी केली असता त्यांनी त्यांचे साथीदार बदाम कडू काळे (रा.शिरोडी, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर), रघुवीर विरूपन भोसले (रा.गाजगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर), महेश नंदु काळे (रा.खोसपुरी, ता.नगर) यांच्या समवेत विळद गावातील डोंगर माथ्यावर असलेल्या मेंढपालाचे पालावर पाच ते सहा दिवसापुर्वी रात्रीचे वेळी महिला व पुरूषांना मारहाण करून चोरी केल्याची माहिती सांगितली. या ताब्यातील आरोपीकडून ३ लाख ४ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल त्यात १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने, चार मोबाईल व दोन मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. पथकाने ताब्यातील आरोपीतांना विश्वासात घेवून आणखी कोठे गुन्हे केले आहेत, याबाबत विचारपूस केली असता त्यांनी मागील १० ते १५ दिवसापुर्वी मांजरी शिवार (ता. गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे मेंढपाळाच्या पालावर रात्रीचे वेळी मारहाण करून चोरी केल्याची माहिती सांगीतली. या आरोपींना गुन्हयाचे तपासकामी मुद्देमालासह एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.


झेंडीगेट येथील घरातील कत्तलखान्यावर छापा टाकून एकाला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

## झेंडीगेट येथील घरातील कत्तलखान्यावर छापा

नगर – घरामध्येच गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करणाऱ्या कत्तलखान्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत एकास ताब्यात घेऊन १० हजार २०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई झेडीगेट येथील बाबा बंगाली येथे सार्वजनिक शौचालय जवळ १५ जून रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास केली. कोतवाली पोलिसांनी शहरातील झेंडीगेट येथील बाबा बंगाली, शासकिय शौचालयाचे बाजुला असलेल्या घरामध्ये सुरु असलेल्या कत्तलखान्यावर छापा टाकला. या कारवाईत कत्तलखाना चालवणारा सरफराज कदीर कुरेशी (वय ३२) यास ताब्यात घेऊन, तेथून १० हजार रुपये किमतीचे गोवंशीय जनावरांचे मांसाचे लहान मोठे तुकडे, १ लोखंडी सत्तुर, १ वजन काटा असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पो. कॉ. सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सरफराज कुरेशी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अंमलदार सचिन लोळगे, तानाजी पवार, दिपक रोहोकले, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, राम हंडाळ, रोहिणी दरंदले यांच्या पथकाने केली आहे.

## मध्यरात्री संशयीतरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर – अंधाराचा फायदा घेवुन काहीतरी दखलपात्र अपराध करण्याच्या उद्देशाने स्वतःचे अस्तित्व लपवून संशयितरित्या वावरणाऱ्या तरुणास कोतवाली पोलिसांनी पकडले. ही कारवाई स्टेशन रोडवरील क्लेरा ब्रुस शाळेच्या भिंतीच्या आडोशाला १५ जून रोजी मध्यरात्री सव्वा बारा वाजता केली. कोतवाली पोलीस शहर हद्दीतील क्लेरा ब्रुस ग्राउंड परिसरामध्ये गस्त घालत असताना मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याचे सुमारास भिंतिच्या आडोशाला अंधाराचा फायदा घेवुन लपून बसलेल्या स्टीवेन अविनाश ओहोळ (वय २०, मुळ रा. कोठी पाटील हॉस्पीटल मागे, सध्या रा. भोसले आखाडा बुरुडगाव रोड) याला पकडले. त्यास त्या ठिकाणी लपून बसण्यामागील कारणाबाबत विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले. त्यामुळे त्याच्या विरुद्ध पोलीस अंमलदार दत्तात्रय कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखलकरण्यात आला आहे.

# व्यावसायिक दीपक परदेशी खूनप्रकरणी बडतर्फ पोलिसासह दोघांच्या विरुद्ध ५०० पानी दोषारोपपत्र न्यायालयात सादर

नगर – व्यापारी दीपक लालसिंग परदेशी (वय ६८) यांचे अपहरण करून खून केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या दोघा संशयितांविरोधात तोफखाना पोलिसांनी सुमारे ५०० पानी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. खंडणीसाठी अपहरण, खून, आणि पुरावा नष्ट करण्याचे गंभीर आरोप या संशयित आरोपींवर ठेवण्यात आले आहेत.

या प्रकरणी अटक करण्यात आलेला संशयित किरण बबन कोळपे (वय ३८, रा. विळद, ता. नगर) हा बडतर्फ पोलिस कर्मचारी आहे. त्याच्या सह त्याचा साथीदार सागर गिताराम मोरे (वय २८ रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) हे असून त्यांनी परदेशी यांचा अपहरण करून खून केल्याची कबुली दिली आहे. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी दीपक परदेशी अचानक बेपत्ता झाले. त्यांच्या कुटुंबियांनी दुसर्याच दिवशी तोफखाना पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद केली. स्थानिक गुन्हे शाखा व तोफखाना पोलिसांनी संयुक्त तपास करत सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब यांच्या आधारे तपासाची साखळी मजबूत केली.

सीसीटीव्हीमध्ये दिसलेली संशयास्पद इंडिका कार ही किरण कोळपे वापरत असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी कोळपे आणि मोरे यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी परदेशी यांच्या खुनाची कबुली दिली. त्यांनी सांगितलेल्या माहितीवरून निंबळक बायपास जवळील नाल्यातून मृतदेह हस्तगत करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी केला. त्यांनी तांत्रिक तपासातून महत्त्वाचे पुरावे गोळा केले. परदेशी यांच्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांबाबत संबंधित व्यक्तींचे जबाब, साक्षीदारांचे नोंदी, आणि इतर पुरावे गोळा करत या गुन्ह्यातील प्रत्येक धागा स्पष्ट केला व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.


### खंडणीसाठी रचलेला घातक कट

परदेशी यांनी विळद येथील चौघांकडून थकबाकी वसुलीचे काम या संशयित आरोपींना दिले होते. मात्र पैसे वसूल न झाल्याने संशयित आरोपींनी उलट परदेशी यांच्याकडूनच १० कोटी रूपयांची खंडणी उकळण्याचे ठरवले. त्यासाठी परदेशी यांना कारमध्ये बसवल्यानंतर कोळपे याने त्यांच्याकडे खंडणीची मागणी केली. प्रतिकार करत असताना मोरेने नायलॉनच्या दोरीने त्यांचा गळा आवळला. परदेशी यांनी कारचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केल्याने दोघांनी त्यांचे हातपाय बांधले आणि अखेरीस कारमध्येच त्यांचा खून केला असल्याचे तपासात समोर आले होते.

# ‘भाजप’च्या जाती–धर्माच्या भिंतीला उत्तर म्हणून, माणसाला माणूस म्हणून जोडणारा पूल बांधत आहे

## कॉ.डॉ. राम बाहेती यांचे प्रतिपादन; भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशनात शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देण्याचा ठराव

नगर – माणसे एकत्र राहून सत्तेविरोधात बंड करू नये, यासाठी सत्ताधारी भाजप सरकार जाती–धर्माच्या भिंती निर्माण करत आहे. मात्र श्रमिक, माणसाला माणूस म्हणून जोडणारा पूल बांधण्याचे काम कम्युनिस्ट करत आहे. जाती–जातीत व धर्मा–धर्मात भांडणे लावून एकमेकांना तोडण्याचे काम सुरु असून, जनतेला श्रमिक, कष्टकरी या एका झेंड्याखाली आणण्याचे कार्य लाल बावट्याची चळवळ करत आहे. जाती–धर्माच्या भिंती उभ्या राहत नाही, तोपर्यंत त्यांचे राजकारण पुढे जाणार नाही. सर्वसामान्यांनी हे राजकारण समजावून घेऊन माणसाला माणसांशी जोडणारा पूल मजबूत करण्याचे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. डॉ. राम बाहेती यांनी केले.



भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन शहरातील कोहिनूर मंगल कार्यालयात उत्साहात पार पडले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन शहरातील कोहिनूर मंगल कार्यालयात उत्साहात पार पडले. यावेळी बाहेती बोलत होते. यावेळी भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशाप्रसंगी भारतीय महिला फेडरेशनच्या राज्य अध्यक्ष कॉ.स्मिता पानसरे, आप्पासाहेब वाबळे, कॉ. बाबा आरगडे, कॉ. बबनराव सालके, जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कॉ. भारती न्यालपेल्ली, ज्ञानेश्वर सहाणे, कॉ. महेबुब सय्यद, कॉ. अनंत लोखंडे, अशोक सब्बन, कॉ. कारभारी उगले, कॉ. भगवान गायकवाड, ॲड. ज्ञानदेव सहाणे, कॉ. सुभाष ठुबे आदींसह व पदाधिकारी व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून २५० प्रतिनीधी सहभागी झाले होते.

पुढे बाहेती म्हणाले की, सत्ताधारी भाजप एक नंबरचा शत्रुपक्ष म्हणून कम्युनिस्ट व लालबावटाकडे पाहत आहे. तत्त्वांशी तडजोड न करणारे कॉम्रेड त्यांच्या गळाला लागत नाही. त्यांना कसेही वळवता येत नाही यासाठी त्यांच्यासाठी कम्युनिस्ट शत्रू ठरत आहे. देशातील कामगार, कष्टकरी, शेतकरी सर्व समाज घटक त्रस्त आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी जाती–धर्मावरून राजकारण केले जात आहे. जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्य, श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम कम्युनिस्ट पक्ष करत आहे. कम्युनिस्ट यांनी आजपर्यंत केलेल्या अनेक आंदोलनातून सर्वात जास्त लाभ हिंदू समाजाला झाला, मात्र कम्युनिस्टांनी कधीही हिंदुत्वाचे नाव पुढे केले नाही. गोरगरिबांच्या नावाने आपला संघर्ष सुरु ठेवला. संविधान बदलून हिंदू राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ४०० पार च्या घोषणा लोकसभेच्या निवडणुकीत देण्यात आल्या असल्याचा आरोप त्यांनी केला.

१९७८ साली व नंतर पुन्हा संघर्ष करून १९९१ पर्यंतचे सर्व अतिक्रमणे नियमाकुल करण्याचा शासन निर्णय सरकारला काढावा लागला. कम्युनिस्टांनी लढले तर मिळते! हे दाखवून दिले. २०२५ पर्यंतचे सर्व अतिक्रमणे नियमित करा, ही कम्युनिस्ट पक्षाची मागणी आहे. शेतकरी, शेतमजूर यांचे प्रश्न तीव्र झाले आहे. महिलांवरील अत्याचार वाढले. अल्पसंख्यांक, दलित समाजाला टार्गेट केले जात आहे. त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन हिसकावले जात आहे. भांडवलदारांच्या शाळा चालण्यासाठी सरकारी शाळा बंद पाडण्याचे षडयंत्र सुरू आहे. सर्वसामान्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारस्थान आहे. या सर्व घटकांवर होणाऱ्या हल्लेच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष निर्भीडपणे आवाज उठवत असल्याचेही बाहेती म्हणाले. तर जनता सुरक्षा विधेयक ब्रिटिश सरकारची पुनरावृत्ती असून, ज्याला भगतसिंग यांनी विरोध केला होता. तो कायदा सरकार विरोधात असलेल्या आंदोलन, चळवळीला दडपण्याचे काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अधिवेशनाच्या प्रारंभी पक्षाचा लाल ध्वज फडकावून त्याला सलामी देण्यात आली. या अधिवेशनात शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी द्यावी, नवीन कामगार संहिता रद्द करावा, शेतीमालाला किमान आधारभूत किंमत मिळण्यासाठी कायदा करावा, अल्पसंख्यांक समाजावर उघडपणे सुरु असलेली दहशतीला पायबंद घालावा, मॉबलिंचिंगच्या प्रकरणात आरोपींना कठोर शिक्षा मिळावी, या मागण्या संदर्भात ठराव घेण्यात आला. लाल बावटे की जय..., लाल झेंडे की जय... लाल सलाम! च्या घोषणांनी सभागृह दणणाले.

प्रास्ताविकात बन्सी सातपुते यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर रस्त्यावरची लढाई कम्युनिस्ट पक्ष करत आहे. मागील तीन वर्षात कोठे होते व पुढील तीन वर्षात कुठे मार्गक्रमण करायचे? याचा आढावा व नियोजन वैचारिक पक्ष परिषदेत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक सब्बन यांनी शेतकरी संरक्षण कायदा आणावा व परदेशात शेतकरी यांना विविध कायद्याच्या माध्यमातून देण्यात आलेल्या संरक्षणाची माहिती दिली.

कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, सत्ताधारी स्वतःचे हित साधण्यासाठी जाती–जाती व धर्मावरून झुंजवण्याचे काम करत आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासन पूर्ण करण्याऐवजी जाती–धर्माचे मुद्दे उपस्थित करुन प्रमुख प्रश्नांना बगल दिली जात आहे. जन सुरक्षा विधेयक हे अर्बन नक्षलच्या नावाखाली चळवळी दडपण्याचे षडयंत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

कॉ. अनंत लोखंडे यांनी जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन पोटाचे प्रश्न मांडावे लागतील, तेव्हा या धर्मांध शक्तीचे पतन होणार असल्याचे सांगितले.

कॉ. महेबुब सय्यद यांनी कम्युनिस्ट यांनी स्वातंत्र्य लढ्यात देशासाठी मोठे बलिदान दिले. आज सत्ताधारी देश प्रेमाचा खोटा बुरखा पांघरला आहे. सर्व माणसांचे रक्त लाल असते, त्याला कोणताही भगवा, हिरवा, निळा रंग नसतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी यांनी केले. कॉ. ॲड.सुधीर टोकेकर यांनी आभार मानले.


तपोवन रोड गोळीबार प्रकरणातील २ फरार आरोपींना पुण्यात पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## तपोवन रोड गोळीबार प्रकरणातील दोन फरार आरोपी पुण्यात पकडले

नगर – शहरातील सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील गोळीबार प्रकरणातील दोन मुख्य फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पुणे जिल्ह्यातील केसनंद येथून जेरबंद केले. ही कारवाई १५ जून रोजी करण्यात आली. भिमराज गेणुजी आव्हाड (वय ५८, रा. नित्यसेवा, पाईपलाईन रोड) व राहुल विजय सांगळे (वय ३३, रा. शिवनगर, सावेडी) अशी पकडलेल्या दोघांची नावे आहेत.

यातील फिर्यादी प्रमोद रामदास घोडके (रा. दत्तमंदीर शेजारी, ढवणवस्ती, तपोवन रोड) यास २ जून रोजी रात्री ५ जणांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी भिमराज आव्हाड याने त्याचे हातातील पिस्टलमधुन फिर्यादीच्या दिशेने २ गोळ्या झाडल्या होत्या. या घटनेबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नासह आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील ३ आरोपींना तोफखाना पोलिसांनी अटक केलेली होती. परंतु या गुन्ह्यातील मुख्य आरोपी आव्हाड व सांगळे गुन्हा घडल्यानंतर फरार झाले होते.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत असताना त्यांना दोन्ही फरार आरोपी पुणे जिल्ह्यातील केसनंद येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने तेथे जावून दोघांना पकडले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार संदीप पवार, अतुल लोटके, अशोक लिपणे, संदीप दरंदले, विशाल तनपुरे, फुरकान शेख, प्रशांत राठोड, उमाकांत गावडे यांनी केली आहे.

